स्वादमय सेवेचा • राजस्थानी थाळी •
स्वादिष्ट.. रुचकर
भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर फोन: 2327060, 9850799850



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



गोड गोड हुरडा
गरम गरम वनभोजन
सहकुटुंब मित्रपरिवारासह
निसर्गाचा
मनमुराद आनंद घेऊया
२५ पेक्षाही अधिक
मनोरंजनाची साधने व
इतर बरेच काही
संपूर्ण परिवारासह
साईबनमध्ये
हुरडा पार्टी
आकर्षक पॅकेज उपलब्ध
आजच संपर्क करा
डॉ. कांकरियांचे साईबन
वेळ : सकाळी ९ ते सायं ५
साईबन कृषी पर्यटन केंद्र,
एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ३१.०१.२०२५ | अंक नं. २८० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# आमदार, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या फलकावर थुंकत फलक फाडल्याचे आरोप

## राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप पदाधिकाऱ्यांनी नोंदवला निषेध; कारवाईची केली मागणी

नगर – नगर शहरात सुरु असलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या निमित्ताने शहरात ठिकठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आ.संग्राम जगताप यांचे स्वागताचे फलक लावण्यात आलेले असून महापालिकेच्यासमोर रस्त्याच्या दुभाजकावर लावण्यात आलेले काही फलक अज्ञात समाजकंटकांनी फाडले असून, काही फलकांवर मावा, गुटखा खावून थुंकल्याचे ३१ जानेवारीला सकाळी निदर्शनास आले. या घटनेचा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी निषेध नोंदवला असून, या समाजकंटकांवर कारवाईची मागणी केली आहे.



महायुतीच्या नेत्यांचे स्वागताचे फलक शहरातून जाणाऱ्या सर्व महामार्गांवर लावण्यात आलेले आहेत. महापालिका कार्यालयासमोर, मुकुंदनगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगत महामार्गावर लावण्यात आलेले काही फलक अज्ञात समाजकंटकांनी ३० जानेवारीच्या रात्री फाडल्याचे तसेच काही फलकांवर मावा, गुटखा खावून थुंकल्याचे ३१ जानेवारीला सकाळी निदर्शनास आले.

त्यामुळे त्या ठिकाणी शहरातील महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते जमा झाले. त्यांनी घटनेचा तीव्र शब्दात निषेध नोंदवला. ज्या फलकांवर थुंकण्यात आले होते, ते फलक पाणी टाकून पुसण्यात आले. तर फाडलेले फलक महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी काढून नेले. याबाबत महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षक यांना निवेदन देवून या अज्ञात समाजकंटकांचा शोध घेवून त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी तुषार पोटे म्हणाले, आ.संग्राम जगताप यांनी नगर शहरात एव्हढ्या मोठ्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करून इतिहास रचला आहे. या स्पर्धेच्या परितोषिक वितरण समारंभास मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व अनेक मंत्री येत आहेत. त्यांच्या स्वागतासाठी हे फ्लेक्स लावले आहेत. पण काही जिहादी प्रवृत्तीच्या समाजकंटकांना हे सहन झालेले नसल्याने त्यांनी या बोर्डाची विटंबना केली आहे. हा प्रकार या आधीही घडला आहे. मात्र आता आम्ही हे सहन करणार नाही.

अजिंक्य बोरकर म्हणाले, शहरातील जिहादींना भगव्या वातावरणाची अडचण झाली आहे. त्यांच्यात समोर येण्याची हिम्मत राहिली नसल्याने पाठीमागून अशे तुच्छ प्रकार करीत आहेत. शहरात या जिहादींचे मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे केली आहेत. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याने महानगरपालिकेच्या आयुक्तांनी रस्त्यावरील अतिक्रमणविरोधी मोहीम राबवावी. त्यांनी कारवाई न केल्यास आम्ही प्रत्यक्षात रस्त्यावर उतरु.

वैभव ढाकणे म्हणाले, राज्याच्या नेते मंडळींच्या स्वागतासाठी लावलेले फ्लेक्स बोर्ड हे भगव्या रंगाचे असल्यानेच या जिहादी वृत्तींच्या लोकांनी या भगव्याचा अपमान केला आहे. त्यांना जर या भगव्या रंगाची जर एव्हढी अडचण होत असेल तर त्यांनी राज्यात असलेल्या महायुती सरकारच्या योजनांचा लाभ घेणे सोडून द्यावे. हे लोकच सर्व सरकारी योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्वात पुढे असतात. या लोकांनी आमच्या भगव्याचा व आमच्या नेत्यांचा अपमान केला आहे, हे आम्ही सहन करणार नाहीच.

यावेळी भाजपाचे माजी शहराध्यक्ष महेंद्र गंधे, तुषार पोटे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कुमार वाकळे, अजिंक्य बोरकर, वैभव ढाकणे, निलेश बांगरे, दिनेश जोशी, अमित गटणे, योगेश ठुबे, ओंकार देशमुख, ओंकार घोलप, किरण गुंजाळ, मयूर मैड, अजय शिंदे, विजय सुंबे, गणेश गोरे, भागवत कुरधरने, अशोक चोभे, सागर डांगरे, भाऊ पुंड, सचिन पवार, दादा पांडुळे, योगेश खताळ, मनीष फुलडहाळे, वैभव दळवी, संतोष फुलारे, चेतन लखापती, गौरव कचरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. *(छायाचित्र पान २ वर)*

# फॉलोअर्स वाढवण्यासाठी गुंड गजा मारणेचे व्हिडिओ इन्स्टाग्रामवर केले व्हायरल

## नगर व धाराशिव जिल्ह्यातील ४ विद्यार्थ्यांना पुण्यात अटक

पुणे – इन्स्टाग्रामवर फॉलोअर्स वाढवण्यासाठी गुंड गजा मारणे याचे व्हिडिओ व्हायरल करून दहशत निर्माण करणाऱ्या चार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अटक करून खंडणीविरोधी पथक दोनने कारवाई केली आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी गजा मारणेच्या नावाने सोशल मीडियावर पुण्याचा किंग, किंग ऑफ महाराष्ट्र, बादशहा अशा प्रकारचे कॅप्शन लिहून इन्स्टाग्रामवर व्हिडिओ व्हायरल केले होते. त्यांच्याविरुद्ध कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अक्षय निवृत्ती शिंदे (वय १९, रा.निमगाव खलू, ता. श्रीगोंदा), सिद्धार्थ विवेकानंद जाधव (वय २०, रा. मोहंमदवाडी), साहिल शाहिल शेख ( वय १९, रा. सुंबा, धाराशिव), इरफान हसन शेख (वय १९, रा. सुंबा, धाराशिव) अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस अंमलदार प्रशांत शिंदे यांनी कोथरूड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून तपास सुरु आहे.

गजा मारणे याच्याही व्हिडिओचे इन्स्टाग्रामवर ग्लोरिफिकेशन केले जात होते. फॉलोअर्स वाढवण्यासाठी मारणेच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून व्हिडिओतून दहशत निर्माण केली. किंग ऑफ पुणे, पुण्याचा बादशहा अशा कॅप्शनसह वाहनांचा ताफा, जमलेली गर्दी, चालत येऊन मारणेचा व्हिडिओ व्हायरल केला होता. धमकीवजा इशाऱ्याचे अनेक व्हिडिओ होते.

दरम्यान, सोशल मीडियाद्वारे व्हिडिओतून दहशत निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.


प्रथम पुण्यस्मरण
स्व. जेठालाल सदवानी
स्व. ता. 31/01/2024
व्यक्तीमत्व तुझे सर्वांना हवेहवेसे होते...
पण नियतीला मात्र हे मान्य नव्हते...
आपल्या पावन स्मृतिस
भावपूर्ण श्रद्धांजली!
- शोकाकूल -
सिंध ट्रेडर्स (फुटाणेगल्ली) मो. 9545841355
समस्त सदवाणी परिवार व नातेवाईक, मित्र मंडळ



सहवास जरी सुटला स्मृती सुगंध देत राहील...
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील...
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली...!
कळविण्यास अत्यंत दुःख होते की,
गं.भा. शंकुतला बबनराव बोरूडे
यांना गुरुवार दि. २३/०१/२०२५ रोजी देवाज्ञा झाली असून त्यांचा
दशक्रिया विधी
शनिवार दि. ०१/०२/२०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता
अमरधाम, नालेगांव, ता.जि.अहिल्यानगर येथे होणार आहे.
शोकाकुल
श्री. सुधीर बबनराव बोरूडे (मुलगा) | श्री. मारुती भागुजी बोरूडे (दीर)
सौ. सुरेखा सुधीर बोरूडे (सून) | श्रीमती सिंधू दत्तात्रय बोरूडे (जाव)
श्रीमती सुनंदा अशोक घोलप (मुलगी) | श्री. प्रमोद मारुती बोरूडे (पुतणे)
सौ. सुलभा संपत रासकर (मुलगी) | श्री. शरद मारुती बोरूडे (पुतणे)
श्रीमती अनुराधा सुनील बोरूडे (सून) | श्री. अतुल दत्तात्रय बोरूडे (पुतणे)
चि. प्रथमेश सुधीर बोरूडे (नातू)
चि. कौशल सुनील बोरूडे (नातू)
समस्त बोरूडे परिवार



१३०० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे आहे
मार्केटयार्ड येथे सर्वसोयींनीयुक्त पहिल्या मजल्यावर १३०० स्क्वे. फूट गाळा, पतसंस्था, ऑफिसेस, दवाखाना,क्लाससाठी भाडेतत्वावर देणे आहे.
9890398098



श्री गणेश जयंती उपवासासाठी
स्पेशल टक्कर
श्री गणेश जयंती शनिवार ०१ फेब्रुवारी
काजु- पॅटीस, शाबुदाणा वडा,
कैलास उडपी
उपवासाची स्पेशल मलाई लस्सी
शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अ.नगर



आता चाणक्य चौकात सुद्धा...
गणेश जयंतीला
प्रसाद मोदकाचा..
खवा, केशर,
मलाई मोदक,
मोतीचुर मोदक
Since 1910
बम्बईवाला
मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीटस् । नमकीन । ड्रायफ्रुट । दिल्ली चाट । फास्टफुड
कापड बाजार, अ.नगर. | चाणक्य चौक, बुरुडगाव रोड, अ.नगर.
मो. : 9822041013 / 9623882710



दिनांक – 31 जानेवारी ते 07 फेब्रुवारी 2025
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
MUKKAM POST DEVACH GHAR 02:00 PM
ILU ILU 1998 0415P M
S K Y FORCE 09:30 AM | 12:00 PM 05:30 PM | 08:00 PM 10:30 PM
FUSSCLASS 06:30P M
JOURNEY 12:15 PM
PUSHPA-2 09:30 PM
DEVA 07:45 AM | 09:15 AM | 10:45 AM | 01:45 PM 02:30 PM | 04:45 PM | 07:45 PM | 10:45 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001



Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING
SHOW TIMING - 31 JAN - 03 FEB 2025
देवा 07.40AM | 09.15AM 10.15AM | 01.15PM | 03.00PM 04.10PM | 07.10PM | 08.00PM 10.00PM | 10.40PM
स्काय फोर्स 08.00AM | 10.35AM | 01.00PM 05.40PM | 08.20PM | 11.00PM
मुक्काम पोस्ट देवाचे घर 06.00PM
जर्नी 12.15PM
इलू इलू 1998 03.20PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow
Near Nagar College, Above Zudio, A.nagar.
9881300400, 0241-2346000
Cinélife™ MINIPLEX



१६ वा वर्धापनदिन..
निरंतर आरोग्यसेवेचा
देही आरोग्य नांदते ! भाग्य नाही या वेगळे !!
झावरे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. सागर उदय झावरे
M.B.B.S., M.S., F.I.A.G.E.S.
जनरल व लॅप्रोस्कोपिक सर्जन
एण्डोस्कोपिस्ट व पोटाच्या विकारांचे विशेषतज्ञ
डॉ. रूपाली झावरे
M.B.B.S., M.S.
स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ
आणि वंध्यत्व निवारण तज्ञ
* उपचार व शस्त्रक्रिया *
* अहोरात्र इमर्जन्सी सेवा * जनरल सर्जरी विभाग * स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभाग * वंध्यत्व निवारण केंद्र * स्त्रियांचे आजार व तपासणी * सुसज्ज ऑपरेशन थिएटर * सुसज्ज स्पेशल रूम्स् * स्वच्छ व प्रशस्त जनरल वॉर्ड * बर्न उपचार केंद्र * ट्रॉमा केअर सेंटर * सरकारमान्य कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया व गर्भपात केंद्र * वेदनाविरहीत प्रसूती * गॅस्ट्रोस्कोपी- अन्ननलिका व जठराची दुर्बिणीद्वारे तपासणी * कोलोनोस्कोपी - मोठ्या आतड्याची दुर्बिणीदारे तपासणी * सर्व प्रकारच्या ओपन व बिनटाक्याच्या शस्त्रक्रिया * सेवाभावी व विनम्र स्टाफ * कॅशलेस सुविधा उपलब्ध.
बॉम्बे बेकरीसमोर, जुना बाजार, अ.नगर. फोन : (0241) 2322138



VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
VARMORA innovating happiness TILES • BATHWARE
KERAKOLL The GreenBuilding Company
CARYSIL German Engineered
colortile
RAK CERAMICS
India's No. 1 NIRALI BG
TIMEX BOND
ICON WORLD OF TILE
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## राज्यमाता गाईचे महत्त्व व जाणीव

अगदी बालकृष्णाच्या काळापासून वैदिक युगापासून आपल्या भारतीय संस्कृतीत गायीला दैवत्वाचे, महत्त्वाचे स्थान आहे. उत्तराखंड या राज्यानंतर महाराष्ट्राने गाईला राज्यमातेचा दर्जा दिलाय. यात आध्यात्मिक परंपरेसह कृषीप्रधान भारत देशात गाईचे महत्त्व अधिकच.

केवळ आपल्याकडेच नव्हे तर विशेषतः इस्लामिक देशांत सरकारच्या अहवालानुसार २०२३-२४ मध्ये तब्बल ३८६ कोटी रुपयांचे (उत्पन्न) गोमय विक्री झाली. गायींच्या शेणाचा वुपर केल्यावर पीक उत्पादन वाढून गुणवत्ताही वाढली या त्या देशांचा अनुभव होता.

भारताकडून शेण खरेदी करणाऱ्यांत मालदीव एक नंबरचा तर अमेरिका दुसरा देश आहे. अलीकडे जैवतंत्रज्ञानाच्या अभ्यासाच्या आधारे, गायीपासून निर्माण होणाऱ्या मलमूत्रापासून ते दुधापर्यंत अनेक टाकाऊ वस्तूंपासून केल्या जाणाऱ्या उत्पादनांचे






आगळेवेगळे महत्त्व सांगितले आहे. सेंद्रीय शेतीला उत्तेजन देण्यासाठी सरकारने आणि विविध स्वयंसेवी संस्थांनी अनेक ठिकाणी गोपालन संस्था उभारल्या आहेत. विशेषतः जैन धर्मातील अनेक संस्थांनी आश्रम, गोशाळा स्थापन करून गोधनाचे संरक्षण, संवर्धनाची जबाबदारी घेतली आहे.

भारतात प्रामुख्याने उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्रात गोपालन संस्था मोठ्या प्रमाणात आहे. आपल्या नगर शहरात निसर्गसृष्टी गोपालन संस्था, अरुणोदय गोशाळा, पांजरापोळ, काळभैरवनाथ गोरक्षण संस्था, माउली स्वदेशी गोपालन संस्था यासारख्या अनेक गोमाता संरक्षण करणाऱ्या संस्था असून, त्यांना दानशूर, समाजहितैषी सहकार्य करीत असतात. गाईचे महत्त्व व जाणीव सदासर्वकाळ राहावी.

# निवासी वैद्यकीय अधिकारी नसल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांचा खोळंबा

## तात्काळ निवासी वैद्यकीय अधिकारीची नेमणुक करा : जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निवेदन

नगर - ग्रामस्थांच्या सोयीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात तात्काळ निवासी वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणुक करण्याची मागणी जनकल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. संस्थेच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी बापूसाहेब नागरगोजे यांची भेट घेऊन सदर मागणीचे निवेदन दिले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विनोद साळवे, सचिव नितीन गोर्डे, श्रीधर शेलार, रोहन शिंदे, मालनताई जाधव, माजी उपसरपंच शिवाजीराव बेरड, तनीज शेख, पोपटराव दोंदे, ह.भ.प. राजेंद्र पाटोळे, बाळासाहेब दोंदे, ॲड. महेश शिंदे आदी उपस्थित होते. तर सदर प्रश्न न सुटल्यास आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.


टाकळी काझी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर निवासी वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक करा अशा आशयाचे निवेदन दिले.

टाकळी काझी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर अनेक दिवसापासून निवासी वैद्यकीय अधिकारी नसल्याने रुग्णांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सुविधा मिळत नसल्याने पर्यायाने रुग्णांना उपचारासाठी शहरातील जिल्हा रुग्णालय येथे धाव घ्यावी लागत आहे. प्रसुतीच्या सुट्टीवर असलेल्या औषध निर्माण अधिकारी व वैद्यकीय अधिकारी वर्ग दोन यांच्यामुळे स्थानिक नागरिकांचा आरोग्यासंदर्भात खोळंबा झाला असल्याचे संस्थेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद आरोग्य विभागाने सदर प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन टाकळी काझी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर निवासी वैद्यकीय अधिकारी यांची नेमणुक करण्याची मागणी ग्रामस्थांच्या वतीने जनकल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने केली आहे.

# पाणी पुरवठ्याबाबत सोशल मिडीयावर अफवा पसरविणाऱ्यांवर कारवाई करणार

### महानगरपालिका प्रशासनाचा इशारा

नगर - शहरात पाणी पुरवठ्याबाबत सोशल मिडियावर खोट्या बातम्या प्रसारीत करून अफवा पसरविल्या जात आहेत. अशा अफवा पसरविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.

याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, पाणी पुरवठ्याबाबत खालील प्रमाणे चुकीच्या / खोट्या बातम्या व्हॉट्सॲपद्वारे प्रसारित होत असल्याचे पाणी पुरवठा विभागाचे ३० जानेवारी रोजी निदर्शनास आले आहे.

''विशेष सूचना- अहिल्यानगर महानगरपालिकेतर्फे सर्वांना विनंती आहे की पाणी गरम करून प्यावे. जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर मशीन बिघाड झाल्याने येत्या ३ किंवा ४ दिवसात कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेतर्फे पाणी फिल्टर न करता सोडण्यात येणार आहे. कृपया ही माहिती आपल्या सर्व मित्र परिवाराला कळवावी आणि आपण पण काळजी घ्यावी.''

अशा फेक स्वरूपाच्या बातम्या सोशल मिडीयावर / व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे शहरभर प्रसारित होत असल्याने शहरातील नागरिकांकडून, पदाधिकाऱ्यांकडून व पत्रकारांकडून महानगरपालिकेकडे विचारणा केली जात आहे.

सोशल मिडीयावर / व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे शहरभर प्रसारित होत असलेल्या मजकूराचे अवलोकन केले असता सदरची माहिती पूर्णतः खोटी, चुकीची व शहरवासियांची जाणीवपूर्वक दिशाभूल करणारी आहे. तसेच यापुढे अशा स्वरूपाच्या फेक बातम्या सोशल मिडीयावर / व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे प्रसारित होत असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यास संबंधितांविरूध्द नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी, असा इशारा महापालिकेच्यावतीने देण्यात आला आहे.

# दहावी बारावी परीक्षा आयोजनातील बदल रद्द

## शिक्षक भारतीचा दणका : सुनील गाडगे

नगर - इयत्ता दहावी-बारावी परीक्षा कॉपीमुक्त व्हावी यासाठी केंद्रावरील केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला होता. हा निर्णय दहावी तसेच बारावीच्या परीक्षा केन्द्रावर गोंधळ निर्माण करणारा असल्याने रद्द करण्याची मागणी शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे जिल्हाध्यक्ष, आप्पासाहेब जगतापशिक्षक यांनी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस, तसेच शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचेकडे केली होती. दरम्यान या मागणीची तात्काळ दखल घेत निर्णय रद्द करण्यात आला आहे. या निर्णयाचे सुनिल गाडगे यांनी स्वागत केले आहे.

इयत्ता दहावी-बारावी परीक्षा कॉपीमुक्त व्हावी यासाठी केंद्रावरील केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलणे बाबत शिक्षण मंडळाने नवा पॅटर्न राबविण्याचा हा निर्णय कायम ठेवल्यास परीक्षा केन्द्रावर गोंधळ निर्माण होऊ शकतो असे शिक्षक भारतीचे म्हणने होते. विशेष म्हणजे इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये मुख्याध्यापक आणि शिक्षकांना त्यांची शाळा सोडून अन्य शाळांमध्ये केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक म्हणून काम करावे लागणार हा निर्णय म्हणजे शिक्षकांवर अविश्वास दाखविणारा होता.

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक व माध्यमिक फेब्रुवारी व मार्च २०२५ परीक्षेसाठी नियुक्त होणाऱ्या पर्यवेक्षक /केंद्र संचालक यांच्या अंतर्गत बदलीचा निर्णय घेण्यात आला होता. शिक्षक भारती संघटनेने सदर निर्णयाचा विरोध करत पुनर्विचार करण्याची मागणी केली होती. शिक्षण आयुक्त पुणे, संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अध्यक्ष पुणे आणि विभागीय मंडळाचे अध्यक्ष यांना पत्र देऊन निर्णय रद्द न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

त्यानुसार ३१ जानेवारी २०२५ रोजी राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार होते. परंतु शिक्षण मंत्री यांनी शिक्षक भारतीची मागणी मान्य करून दहावी बारावीच्या परीक्षा आयोजनातील अदलाबदलीचा निर्णय रद्द केला आहे. या निर्णयाचे शिक्षक भारतीच्या वतीने राज्य सचिव सुनिल गाडगे, शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, सचिव विजय कराळे, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ. आशा मगर, कैलास जाधव, जिल्हासचिव विजय कराळे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, नवनाथ घोरपडे, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, सोमनाथ बोंतले, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानित च्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी स्वागत केले.



## मराठबोली संस्थेच्यावतीने वारसा दिवाळी अंकास द्वितीय पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अहिल्यानगर येथील सावेडी उपनगर शाखा व शांतीकुमार फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनच्यावतीने प्रकाशित होणाऱ्या वारसा दिवाळी अंकास पुणे येथील मराठबोली संस्थेच्यावतीने नुकतेच द्वितीय पुरस्काराने मराठबोलीचे अध्यक्ष परमेश्वर उमरदंड, साहेबराव पवळे, सचिन कुरकुटे आदींच्या हस्ते गौरवण्यात आले, असे म.सा.प सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष व वारसा दिवाळी अंकाचे प्रमुख संपादक नरेंद्र फिरोदिया व कार्यकारी संपादक जयंत येलुलकर यांनी सांगितले.


शहरात सुरु असलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी येणाऱ्या राज्यातील नेत्यांच्या स्वागतासाठी लावण्यात आलेले फ्लेक्स बोर्ड फाडल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस व भाजपचे पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी आक्रमक झालेल्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणा देत घटनेच्या निषेधार्थ आंदोलन केले. तसेच पाण्याने फ्लेक्स बोर्ड धुऊन काढले. (छाया - लहू दळवी)

# निर्धारित दिवशी रात्री १२ पर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापरास परवानगी

नगर - ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम, २०१७ अन्वये ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतागृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागाखेरीज जिल्ह्याच्या महसूल स्थळ सीमेच्या हद्दीत सन २०२५ मधील पुढील नमूद १५ दिवसांसाठी ध्वनी प्रदुषणाची पातळी विहित मर्यादेत राखून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांच्या वापरास जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी आदेशाद्वारे परवानगी दिली आहे.

१९ फेब्रुवारी २०२५ शिवजयंती (तारखेनुसार शासकीय), १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, १ मे महाराष्ट्र दिन, २८ ऑगस्ट, १,२ व ६ सप्टेंबर गणपती उत्सव, ५ सप्टेंबर ईद-ए-मिलाद, २९ व ३० सप्टेंबर नवरात्र उत्सव, २१ ऑक्टोबर दीपावली, २५ डिसेंबर ख्रिसमस, ३१ डिसेंबर २०२५ व उर्वरित दोन दिवस शासनाने विहित केलेल्या अटीच्या अधिन राहून आवश्यकतेनुसार परवानगी देण्यात येईल.

उत्सव कालावधीमध्ये ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्राधिकरणाने निश्चित केलेल्या ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन करावे. तसेच ध्वनी प्रदूषण नियम २००० अंतर्गत स्थापन केलेल्या प्राधिकरणाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींवर उच्च न्यायालयाने १६ ऑगस्ट २०१६ रोजी दिलेल्या आदेशात विहित पद्धतीने कार्यवाही करावी. पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शांतता क्षेत्राची माहिती घेऊन त्या भागातील ध्वनिमापक संयंत्राद्वारे ध्वनिचे कंट्रोल नमुने घ्यावेत. त्याबाबत पंचनामा व ठाणे दैनंदिनीमध्ये नोंद घ्यावी. एखाद्या ठिकाणी ध्वनी प्रदूषण होऊन आजुबाजुच्या लोकांना व सर्वसामान्यांना त्रास होत आहे अशी तक्रार आल्यास ती लिहून घ्यावी व स्टेशन डायरीला नोंद करुन त्या तक्रारीचा खरे-खोटेपणा पहाण्यासाठी घटनास्थळी जावे. घटनास्थळी गेल्यावर दोन पंचाच्या समक्ष ध्वनिची तीव्रता किती आहे याची नोंद घ्यावी. घटनास्थळाचे छायाचित्रण करावे. मोजलेली तीव्रता ही मानद मर्यादेपेक्षा अधिक असल्यास उचित प्राधिकरणाकडे पाठवून द्यावेत.

घटनास्थळी जाणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने आपल्या अहवालासोबत चौकशीचे सर्व कागदपत्रे त्वरित पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ व ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम २००० मधील तरतुदीप्रमाणे निर्माण करण्यात आलेल्या प्राधिकरणाकडे पाठवून द्यावेत. वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या आदेशामधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. तसेच निवडणूक कालावधीत निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या आदर्श आचार संहितेचा नियमावलीचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही आदेशामध्ये नमूद करण्यात आले आहे.

## बोल्हेगाव येथे गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

नगर - राहत्या घरात छताच्या फॅनला साडीने गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केल्याची घटना ३० जानेवारीला सकाळी बोल्हेगाव परिसरात घडली. सुरज बाजीराव गजरे (वय २१, रा. मनोलीला नगर, बोल्हेगाव) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

मयत सूरज याने घराच्या छताच्या फॅनला साडीने गळफास घेतला. ही बाब पहाटेच्या सुमारास त्याचे वडील बाजीराव मोहन गजरे यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तातडीने सुरज यास उपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले परंतु उपचारापूर्वीच तो मयत झाला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. त्याच्या आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नाही.

याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर कुलकर्णी यांच्या माहितीनुसार पोलीस नाईक रमेश शिंदे यांनी दिलेल्या माहितीवरून तोफखाना पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

## संतोष अनलदास यांचे आकस्मिक निधन



नगर - सावेडी उपनगरातील श्रमिक नगर येथील रहिवासी संतोष नरसय्या अनलदास (वय ३८) यांचे ३१ जानेवारीला सकाळी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात आई पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे. मयत संतोष यांच्या आकस्मिक निधनाने श्रमिकनगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## अनिकेत गागरे याचे अपघाती निधन



नगर - मांडवे खुर्द (ता.पारनेर) येथील अनिकेत नामदेव गागरे (वय १९) याचे २९ जानेवारी रोजी ट्रॅक्टर पलटी होऊन अपघाती निधन झाले. त्याच्यावर मांडवे खुर्द वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्याच्या मागे आई, वडील, आजी, आजोबा, १ बहीण, चुलते, चुलती, चुलत भाऊ असा मोठा परिवार आहे. मांडवे खुर्द गावचे माजी कामगार पोलिस पाटील श्रीरंग पाटील गागरे, प्रगतशील शेतकरी बाजीराव पाटील गागरे व संपतराव गागरे यांचा तो नातू होता.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती युवा पिढीला दिशादर्शक ठरेल : राम शिंदे

## विविध उपक्रमांद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य राज्यभरात पोहोचविणार : सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार

नगर - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याची तसेच त्यांच्या शौर्याची चित्ररथाच्या माध्यमातून देण्यात येणारी माहिती युवापिढीला दिशादर्शक ठरेल, असा विश्वास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याची माहिती देणाऱ्या चित्ररथाचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये (दूरदृष्यप्रणालीद्वारे) उद्घाटन करण्यात आले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याची माहिती देणाऱ्या चित्ररथाचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये (दूरदृष्यप्रणालीद्वारे) उद्घाटन करण्यात आले.

अहिल्यानगर पोलीस परेड ग्राऊंड येथे आयोजित या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सह संचालक राम पांडे, पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, महेंद्र गंधे आदी उपस्थित होते.

प्रा. शिंदे म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या कार्यकाळात समाजातील शोषित, पीडित व वंचितांना न्याय मिळवून देण्याबरोबरच अनेक धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार, जलसंवर्धन आणि समाजातील अपप्रवृत्तीला आळा घालण्याचे काम केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त राज्यात अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून चौंडी विकासकामाच्या बृहतआराखड्यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती राज्यातील युवा पिढीपर्यंत जावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात अशा प्रकारच्या चित्ररथाचे आयोजन करावे, असेही ते म्हणाले.

मंत्री आशिष शेलार म्हणाले, धर्मपरायणता, दानशूरपणा व मानवतावाद हे गुण अंगी असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या कर्तृत्ववान व कार्यक्षम राज्यकर्त्या होत्या. कृषी कर पद्धतीमध्ये सुधारणा, महिलांना विशेष हक्क, वस्त्रोद्योगास चालना व आर्थिक सुधारणा हे त्यांचे कार्य इतिहासात अजरामर झाले. बारव आणि घाटांची उभारणी, अन्नछत्र निर्मिती, मंदिरांचे जीर्णोद्धार आदी असंख्य समाजोपयोगी कार्यक्रम अहिल्यादेवींच्या जीवनकार्याचे वैशिष्ट्य असल्याचेही ते म्हणाले.

अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती जनमानासापर्यंत पोहोचवण्यासाठी चित्ररथाची निर्मिती करण्यात आली असल्याचे सांगत श्री.शेलार म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्ताने सांस्कृतिक कार्य विभागाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. राज्यातील सहा विभागात दर्जेदार कार्यक्रम घेण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या गुणवर्णनाचा कार्यक्रम प्रत्येक जिल्हास्तरावर घेण्यात येणार आहे. त्यांच्या कार्यावर आधारित पुस्तकाची निर्मिती करण्यात येत आहे. तसेच टपाल तिकिटाचे अनावरणही करण्यात येणार आहे. अहिल्यादेवी होळकरांनी मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी, घाट व बारव निर्माणसाठी, महिलांच्या हक्कासाठी, शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य तसेच प्रशासनातील नेतृत्व व सामान्यांसाठी वेचलेल्या आयुष्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

रोजगाराभिमुख औद्योगिक धोरण, अंधश्रद्धा निर्मूलन, अनिष्ट रूढी बंद करणे, धर्मशाळांची उभारणी, करप्रणाली या विकासाच्या दिशा या त्यांच्या आयुष्यातल्या अग्रणी कर्तुत्वाचा भाग असल्याचेही मंत्री शेलार म्हणाले.

जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्याची माहिती ग्रामीण भागातील जनतेपर्यंत चित्ररथाच्या माध्यमातून पोहोचविण्याऱ्या सुंदर अशा चित्ररथाची निर्मिती करण्यात आली आहे. अहिल्यादेवी होळकरांनी त्यांच्या जीवनात जलसंवर्धनाला अधिक महत्व दिले. त्यांच्या ३०० व्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने जिल्ह्यातील ३०० तलाव गाळमुक्त करण्याचा प्रयत्न करू, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सह संचालक राम पांडे यांनी चित्ररथाविषयी माहिती दिली.

# गृहिणी

## आरोग्य

### हृदयाच्या स्नायूंना द्या बळकटी

दररोज चालल्याने हृदय निरोगी राहते. हे रक्तदाब नियंत्रित करते, कोलेस्टेरॉलची पातळी कमी करते आणि हृदयाच्या स्नायूंना बळकटी देते. चालण्याने कॅलरीज बर्न होतात आणि वजन कमी होण्यास मदत होते. दररोज चालल्याने मधुमेहाची पातळी नियंतीत राहते.

## पाककला

### खजूर बर्फी

**साहित्य :** खजूर - ५०० ग्रॅम, दूध - १ कप, तूप - चमचे दोन, सुकामेवा - ५० ग्रॅम सुकामेवा, वेलची पावडर - १/४ टीस्पून, नारळ किसलेले दोन टेबलस्पून

**कृती :** सर्वात आधी खजूर स्वच्छ धुवून घ्यावे. तसेच त्यामधील बिया काढून टाकाव्या. यानंतर त्याचे लहान तुकडे करा. आता चिरलेल्या खजूर मिक्सरमध्ये बारीक करून त्याची गुळगुळीत पेस्ट बनवा. जर पेस्ट जाड असेल तर त्यात थोडे अधिक दूध घाला. नंतर एका पॅनमध्ये तूप गरम करावे. आता त्यात खजूराची पेस्ट घाला आणि सतत ढवळत मंद आचेवर चांगले शिजवा. नंतर पेस्ट घट्ट होऊ लागली की त्यात बारीक चिरलेली सुकी मेवे आणि वेलची पावडर आणि नारळाचा किस घालावा. यानंतर, मिश्रण घट्ट होऊन पूर्णपणे सेट झाल्यावर ते एका प्लेटमध्ये काढा आणि चमच्याने पसरवा. आता थंड होऊ द्या. तुमच्या आवडीनुसार वड्या कापून घ्या.

## वास्तू

### वरच्या मजल्याबाबत

अनेक वेळा बंगला किंवा रो-हाऊसमध्ये वर एक मजला वाढविण्याचा विचार केला जातो. अशा वेळी तो मूळ घराच्या कोणत्या दिशेत असावा याबद्दल वास्तुशास्त्रात अत्यंत विस्तृतपणे मार्गदर्शन उपलब्ध आहे. तसेच आजकाल ड्युप्लेक्स अथवा पेंटहाऊसबद्दल आकर्षण वाढत चालले आहे.

## सल्ला

नॉनव्हेज जर खाल्ले असेल तर त्यावर कधीही दूध पिऊ नये. ते शरीरासाठी हानिकारक आहे.

## सौंदर्य

* शॅम्पू करण्याअगोदर केसांना तेल जरूर लावावे.
* शक्य असल्यास केसांना वाफ द्यावी.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १ फेब्रुवारी २०२५

**श्री गणेश जयंती, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, माघ शुक्लपक्ष, पू.भा.२६।३३, सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. शत्रू पराजित होईल. महत्वपूर्ण कार्यात यश मिळेल.

**वृषभ** : निर्णय घेण्यापूर्वी दोनदा विचार कराल. नुकसान संभवते.

**मिथुन** : प्रेमसंबंधांमध्ये आवश्यक प्रगती होईल. आपल्या धाडसात वाढ होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : प्रसिद्धी वाढण्याची शक्यता आहे. आपले धाडस वाढेल.

**सिंह** : कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल पण एखाद्याला जामीन देणे धोकादायक ठरेल.

**कन्या** : आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. धनाच्या रुपात यश मिळवा. मागील उधारी वसुल होईल.

**तूळ** : अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील.

**वृश्चिक** : कार्यक्षेत्रात वेगाने कार्य कराल. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**धनु** : वेळ अनुकूल आहे. कामांमध्ये प्रगती होईल. आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**मकर** : मातृपक्षाकडून प्रसन्नता राहील. काही प्रेमपूर्ण अनुभव आज येऊ शकतात.

**कुंभ** : इतर लोकांना आपल्या स्वतःची गरज समजेल.

**मीन** : हुशारीने गुंतवलेले धन आपणास ध्येयाजवळ घेऊन जाईल. आरोग्य मध्यम राहील.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## पांढरे केस

ती :- 'तुमचे पांढरे केस झाले याचे तुम्हाला वाईट वाटत असेल.

तो :- अजिबात नाही. उलट पांढरे केस चांगले असतात.

ती :- पांढ्या केसांना कधी कुणी चांगलं म्हणेल तरी का ?

तो :- एखाद्या टक्कलवाल्याला विचारून बघ.

# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* देशातील पहिली डिजीटल साक्षर ग्रामपंचायत ठरली आहे? - मल्लमपारा (केरळ)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७१०४

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ■ | ५ |
| ६ | | ■ | ७ | ८ | | ९ | |
| १० | | ■ | ■ | | ■ | ११ | |
| १२ | | १३ | ■ | १४ | १५ | | ■ |
| | ■ | १६ | | ■ | | ■ | १७ |
| १८ | १९ | | ■ | २० | | | |
| ■ | | ■ | ■ | २१ | | ■ | |
| २२ | | | | | ■ | २३ | |

**आडवे शब्द :-** १) पूर्वीच्या काळातील तलाठी; कुलकर्णी ६) दीन; गरीब ७) गरम मसाल्यातील एक पदार्थ १०) बुद्धिबळ, सोंगट्या वगैरे ज्यावर खेळातात ते विशिष्ट कापड ११) मार्ग; रस्ता; पथ १२) दणकट; कणखर; बळकट १४) एक स्थितिस्थापक पदार्थ १६) चालू काळी; वर्तमान स्थितीत १८) बिनवासाचे एक फूल २०) पांघरण्याचे एक उंची वस्त्र; शाल २१) निवडणुकीत याचे दान करतात २२) जुलमी; श्रेष्ठ; मोठा; शक्तिमान २३) हा पाण्याच्या बाहेर जिवंत राहू शकत नाही

**उभे शब्द :-** १) घरातील मधला भाग १) परंपरेने चालत आलेले २) हाताची बोटे दारावर आपटून केलेला आवाज ३) पद्धत; चाल; तऱ्हा; रिवाज ४) जाड दोर; दोरखंड ५) खट्याळ; चहाटळ ८) मागे पाऊल; मागे सरणे ९) एक मराठी आडनाव १३) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र १५) यशस्विता; भरभराट १७) धार्मिक शिक्षण देणारी मुस्लिमांची शाळा १९) रंक; दीन २०) सकल

**शब्दगंध क्र. ७१०३ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | मा | ना | ■ | ज | मा | न | त |
| ■ | ज | ब | ळ | पा | स | ■ | या |
| मा | ध | ■ | ■ | न | ■ | बा | ही |
| ब | र | प | क्ष | ■ | ब | स्तू | ■ |
| ळ | ■ | ता | ण | ■ | र | ■ | बे |
| ती | स | ■ | ■ | ग | ण | गो | ल |
| ■ | मी | प | णा | ■ | भा | ष | ■ |
| खा | प | र | ■ | ■ | त | ह | क |

**फिल्मीचक्कर क्र. ११७४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्यो | त | से | ज्यो | त | ज | गा | ते |
| ती | ■ | ह | ■ | ■ | ■ | व | ■ |
| ■ | मे | रा | ना | म | जो | क | र |
| ते | रे | ■ | दि | ■ | ■ | ■ | वी |
| ■ | ह | म | रा | ज | ■ | ना | ना |
| सु | म | न | ■ | मी | ■ | जा | ■ |
| ■ | द | ■ | मा | र | ■ | व | ■ |
| ह | म | जो | ली | ■ | सा | ज | न |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलन : अ‍ॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : यश मिळविण्यासाठी उचललेले प्रत्येक पाऊल हे शेवटच्या पावला इतकेच महत्त्वाचे असते.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## पृथ्वीवर सर्वत्र वेळ सारखीच का दाखवली जात नाही?

भारतात दुपारचे ४ वाजलेले असतात तेव्हा जपानमध्ये रात्र पडत असते, अमेरिकेत पहाट व्हायची असते तर लंडनमध्ये लोक ऑफिसला जायच्या गडबडीत असतात. याउलट भारतात हिवाळ्यात आसाममध्ये पहाटे पाचला लख्ख उजाडते तर मुंबईत सातला, असे का होते ?

पृथ्वी स्वतःभोवती एक पूर्ण प्रदक्षिणा करायला जो वेळ घेते त्याला आपण एक दिवस असे म्हणतो. या दिवसाचे आपण २४ सारखे भाग केले. हा प्रत्येक भाग म्हणजे एक तास आणि या तासाचे पुढे ६० भाग करून त्याला आपण मिनीट असे नाव दिले आहे. त्या मिनिटाचे पुन्हा ६० सेकंद असतात.

हे भाग अर्थात मानवनिर्मित आहेत. जगात सर्वत्र एकच घड्याळ वापरायचे ठरले तर आपण ज्याला पहाटे पाच म्हणू ते दुसऱ्या एखाद्या देशात संध्याकाळचे पाच ठरतील. हा घोटाळा टाळण्यासाठी प्रत्येक देश एका विशिष्ट रेखांशास वेळ प्रमाण रेखांश ठरवतो. भारतात हा वेळ प्रमाण रेखांश अलाहाबादेतून जातो. लंडनजवळच्या ग्रिनीच वेधशाळेतून जाणारा रेखांश हा सर्व जगाचे वेळप्रमाण. इथून दर १५ओ पूर्वेला आले की ग्रिनीच वेळेत एक तास मिळवायचा नि पश्चिमेस जाताना दर १५ओस एक तास कमी करायचा. असे जगाचे २४ वेळ भाग पाडले आहेत. यामुळे प्रत्येक देश आपल्या सोयीने वेळ रेखांश निवडून आपली प्रमाणवेळ ठरवतो.

## मांजरीच्या गळ्यातील घंटा

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका मोठ्या घरामध्ये शंभर उंदीर राहायचे. ते आपले पोट भरण्यासाठी संपूर्ण दिवस फिरत असायचे. एक दिवस अचानक त्यांच्या घरात एक मोठी मांजर शिकार करण्यासाठी आली. मांजरीला पाहताच सर्व उंदीर आपापल्या बिळात लपून गेले. मांजरीने पहिले की, या घरात खूप उंदीर आहे. तिने तिथेच राहायचे ठरवले. आता मांजर तिथेच राहायला लागली. आता तिला भूक लागली की, उंदीर बाहेर आला की, त्याच्यावर झडप घालायची आणि त्याला खाऊन टाकायची.

आता रोज असे व्हायला लागले त्यामुळे उंदरांची संख्या हळूहळू कमी व्हायला लागली. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी सर्व उंदीर एकत्र जमले व एक सभा आयोजित केली.सभेमध्ये सर्व उंदीर उपस्थित होते. सर्वांनी वेगवेगळ्या प्रकारचे उपाय सांगितले. जेणेकरून मांजरीला थांबवता येईल व सर्व उंदीर सुरक्षित राहतील. पण कोणाचाही उपाय असा नव्हता की, मांजरीचा सामना करता येईल. आता अचानक एका वृद्ध उंदराने एक सल्ला दिला. तो म्हणाला की, आपण मांजरीपासून स्वतःचे रक्षण करू शकतो. पण त्याकरिता एक घंटी आणि एक दोरीची गरज पडेल. वृद्ध उंदीर म्हणाला की आपण मांजरीच्या गळ्यात घंटा बांधू आणि जेव्हा ती येईल तेव्हा घंटा वाजल्याने आपल्याला धोक्याची माहिती मिळेल. धोका जाणवल्यानंतर, आपण पळून जाऊ आणि आपल्या बिळात लपू.

यामुळे आपण मांजरीचे शिकार होण्यापासून वाचू. सर्व उंदीर आनंद साजरा करत होते तेव्हा अचानक एक अनुभवी उंदीर उभा राहिला. तो सर्व उंदरांना जोरात म्हणाला, गप्प राहा, तुम्ही सगळे मूर्ख आहात. त्यानंतर, अनुभवी उंदराने जे सांगितले ते ऐकून सर्वांना धक्का बसला. उंदीर म्हणाला ते ठीक आहे, पण जोपर्यंत मांजरीच्या गळ्यात घंटा बांधली जात नाही तोपर्यंत आपण सुरक्षित नाही. आता तुम्ही सर्वांनी आधी मला सांगा की मांजरीच्या गळ्यात घंटा कोण बांधणार? सर्व उंदीर एकमेकांकडे पाहू लागले. बैठकीत शांतता होती. सर्व उंदीर निराश झाले. मांजरीचा आवाज ऐकून सर्व उंदीर पळून गेले आणि आपापल्या बिळात लपले.

तात्पर्य : केवळ योजना बनवून तुम्ही यशस्वी होत नाही.

# रहमते दर्शन (भाग - १)



दूसरे शब्दों में, जैसे ही हम 'मन' के रास्ते को छोड़कर 'आत्मा' के रास्ते पर चलना शुरू कर देते हैं तो हमारे विकास की पूरी दिशा ही बदल जाती है। यह तो आध्यात्मिक जागृति का सवाल है। बाकी सब कुछ तो स्वतः ही मिल जाता है। प्रायः सत्संगीजन अपनी उपलब्धियों के बारे में महाराज जी को इसलिये बताते थे ताकि महाराज जी उनकी उन्नति की प्रशंसा करें। महाराज जी शांतिपूर्वक सबकी बात सुनते थे और शाबाशी देते थे और इसके पश्चात बताते थे कि हमें जो कुछ प्राप्त हो गया है, केवल उससे ही संतोष नहीं कर लेना चाहिये। हमें यह सोचना चाहिये कि अभी कितना काम शेष है। क्योंकि जीवन थोड़ा है और हमने जो कार्य करना है, वह बहुत अधिक है। महाराज जी प्रायः लोगों को सुझाव देते थे कि हमें उन सत्संगियों का अनुसरण करना चाहिये जो दिलो-जान से गुरु के काम में लगे हुए हैं और जिनके अच्छे परिणाम उन्हें प्राप्त हो रहे हैं। गुरु सत्ता उनकी सहायता करती है और वे सफलता की चरम सीमा पर पहुँच जाते हैं। हमें उनसे कुछ सीखना चाहिये ।

## मधुर यादें

महाराज जी के व्याख्या करने के तरीके वास्तव में निराले थे। महाराज जी कहा करते थे, 'जीते-जी मरना सीखो ताकि तुम जीना सीख जाओ। एक बार एक आदमी ने उनसे पूछा, महाराज जी, ये कैसे संभव है? क्योंकि यदि हम एक बार मर जायें तो हमें यह शरीर छोड़ना पड़ता है। तो हम दोबारा कैसे जिंदा हो सकते हैं? तो महाराज जी ने भ्रम का परदा हटाने के लिए सत्यवान की एक कहानी सुनाई। सत्यवान एक लकड़हारा था, जो अपने विवाह के एक वर्ष पश्चात लकड़ी काटते हुए मर गया। सावित्री, जो एक आदर्श और पतिव्रता स्त्री थी, उसने जीते जी (स्वेच्छा से) शरीर छोड़ने की विद्या सीख रखी थी। जब सत्यवान की मृत्यु हो गई तो सावित्री ने इस विद्या का प्रयोग किया और अपने पति की आत्मा को उसके शरीर में वापिस ले आई। ये उसने अपने अटूट विश्वास और प्रबल इच्छा शक्ति के बल पर किया। यदि सावित्री इस कार्य को हजारों साल पहले कर सकती थी तो उसी कार्य को हम आज क्यों नहीं कर सकते ?

दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज के बारे में लिखने की यह प्रक्रिया अंतहीन है, परन्तु जब मैं उनकी प्रभु प्रेम में मदमस्त आँखों कर ध्यान करता हूँ जो कि हमेशा ही दिव्य मदिरा में सराबोर रहती थीं और हमें दोनों जहानों के रहस्य समझाती थीं, तो मेरी आँखों में उनके प्रेम के आँसू छलक उठते हैं। उन्होंने असंख्य जीवात्माओं को प्रभु का मार्ग दिखाया और उन्हें जीवन-मृत्यु के दुःख और तकलीफों के भय से हमेशा मुक्त कर दिया। मेरी महाराज जी से यही प्रार्थना है कि उनके द्वारा प्रदत्त ये आध्यात्मिक निधि, दिन दूनी और रात चौगुनी बढ़ती चली जाये।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

दर्द को लाभ में कैसे बदलें? मूर्खतापूर्ण दर्द जो दूसरों से मिलता है वह रिपीट न होने दें। आप अपना नजरिया साकारात्मक रखें। प्रत्येक दर्द में साकारात्मक रहें, कुछ नया करें। यदि आप एक बेहतर संसार चाहते हैं, जिस में बेहतरीन देश हों, बेहतरीन इलाके हों, बेहतरीन राज्य हो, बेहतरीन परिवार हो तो आप को बेहतर इन्सान बन कर उसकी शुरुआत करनी चाहिए। यदि हम व्यक्तिगत चरित्र पर ध्यान देते हैं तो हम संसार को एक बेहतरीन संसार बना देते हैं। हमें अपनी सफलता के वजाए, चरित्र पर ज्यादा ध्यान देना चाहिए। चरित्रिक विकास अपने मस्तिष्क को व्यापक बनानें और अपनी योग्यताओं को बढ़ाने से ज्यादा जरूरी है। चरित्र अर्थात हम ऐसा कोई कार्य नहीं करेगें जो परिवार, समाज, धर्म और सरकार विरोधी हो । चरित्र अर्थात हम व्यक्तिगत रूप से किसी से नाजायज संबन्ध नहीं रखेंगे। चरित्र अर्थात ऐसा कोई कर्म और संकल्प नहीं करेगें, जिस के सोचने मात्र से ही बुरा-बुरा लगता है।

दिमाग का विकास और त्याग

सब से पहली जगह हमारा मस्तिष्क है। सब से पहले अपनी सोच को कार्य है, हम कुछ ऐसा करें, जिस से लोगों को दिशा मिले। प्रत्येक व्यक्ति जीवन में कुछ लोगों का नेतृत्व करता है। परंतु इस दुनिया से जाते ही हमारा नेतृत्व खत्म हो जाता है। अगर हम श्रेष्ट चीजें लिख जाएं तो लोगों का युगों तक नेतृत्व करते रहेगें। लेखन से हम उन लोगों से भी बात कर सकेगें, जिन्हें हम जिंदगी में कभी नहीं मिलेगें। इस लिये मरते दम तक इस कला को सुधारते रहें। दूसरों की उमीद से ज्यादा करें। अपने से अपेक्षा ज्यादा करें, दूसरों से नहीं। अपने से ज्यादा करने की उमीद करें। अपने में ज्यादा विश्वास करें। अपनी ज्यादा मदद करें। अपने में उत्कृष्टता लानी है। । उत्कृष्टता अर्थात अपना सर्व श्रेष्ट करना, हर चीज में, हर मायने में। कभी कभार महत्वपूर्ण चीजें करना छोड़ न दें बल्कि हर दिन महत्वपूर्ण चीजे करें। हर रोज कुछ नये लोगों की मंसा सेवा करें, हर रोज कुछ नई पुस्तके पढ़ें, हर रोज योग की कोई नई विधि खोजें या सीखें, हर रोज कुछ ऐसा लिखो जो सब के लिये जरूरी हो। यह कहना छोड़ दो कि मैं यह नहीं कर सकता। हर रोज सुबह अपने दिल से पूछो आज मैं लोगों की भलाई कैसे करूगां। फिर रात चेक करो आज दूसरों की क्या भलाई की। हमें नदी बनना हैं, ठहरा हुआ जलाशय नहीं बनना।

## दिमाग की शक्ती

दिमाग का विकास और कृतज्ञता

दिमाग का विकास करने के लिये आप को कुछ छोड़ना होगा, बदलना होगा। वही चीजें न करें जो अब तक की हैं। सब से महान कुछ त्यागना होगा। लोग अपने असंतोषजनक जीवन से चिपके रहते। हैं और किसी बेहतर चीज को पाने का प्रयास नहीं करते। उनके मन में डर होता है कि कहीं उन्हें इस से भी बुरी चीज न मिल जाए।। जीवन में कई दोराहे आते हैं। आगे बढ़ें या पीछे हटें ? इन दो राहों में से किसे चुने? सिर्फ परिस्थितियां बदलने की उम्मीद न करते रहें। कुछ ऐसा नया करें जो लक्ष्य है वह मिल जाए। कुछ समझ न आए तो पुस्तक पढ़ना आरंभ कर दें । पुस्तकें पढ़ने के साथ साथ और बेहतरीन बननें का प्रयास करें। निष्क्रिय रहने की बजाए व्यायाम आरंभ कर दें। सात्विक खान पान का ध्यान रखें। घर का या अपने हाथ का बना भोजन खाएं। अगर भोजन पर ध्यान नहीं रखेंगे तो उच्च कोटि के योगी नहीं बन पाएंगे।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आईच्या दुधाचे महत्त्व आपण स्तनपानामध्ये बघितले आहे. बाळाची जन्मानंतर पहिली नैसर्गिक लस म्हणजे आईचे दूध होय. या दूधामधून बाळाला आजारांविरुद्ध लढण्यासाठी रोगप्रतिकारकशक्ती मिळते; परंतु काही कारणास्तव सर्वच बालकांना आईचे दूध मिळणे शक्य नसते, अशा वेळी आई बाळाला स्तनपान करू शकत नाही: परंतू बाळाला त्याच्या वाढीसाठी जन्मानंतर लगेच पोषक आहार मिळणे गरजेचे असते. बाळाला स्वतःच्या आईचे दुध मिळणार नसले. तरी त्याला मिळणारे दूध हे दुसऱ्या एका आईचेच असते. दुसऱ्या आईचे दूध हे बाळाच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक वाढीसाठी उपयुक्त ठरते. बाजारात उपलब्ध असलेले मिल्क पावडरचे डबे, म्हशीचे, गायीचे, शेळीचे दूध हे बाळाला पचण्यास त्रासदायक ठरते. अशा प्रकारे बाजारात मिळणाऱ्या दुधाने बाळाचे पोषण होण्याऐवजी त्यापासून अपाय होऊ शकतो. त्यामुळेच कमी वजनाच्या बाळांसाठी ह्युमन मिल्क बँकेतील दूध हे एक वरदान ठरले आहे. कमी वजनाच्या बाळांना वाचविण्यासाठी, मोठ्या शहरांमध्ये सर्व सुविधा असलेल्या NICU (Neonatal Intensive Care Unit) मध्ये अ‍ॅडमिट करावे लागते. अशा वेळी बाळाची आई जवळ नसते. पावडरचे दूध बाळाला पचत नाही. त्या वेळी ह्युमन मिल्क बँकेतील दूध उपयोगी पडते. दान केलेल्या आईचे दूध दुसऱ्याच्या पोटी जन्मलेल्या नवजात बाळाची भूक भागवून शरीराचे पोषण करते. देवकीने जन्म दिलेला कृष्ण हा यशोदेच्या दुधावर जसा वाढला त्याच प्रकारे हे नवजात बाळ वाढणार असते. आयुर्वेदामध्ये सुद्धा हजारो वर्षांपूर्वी ही कल्पना सांगितलेली आहे.

## नवजात बालकाची परिचर्या

बाळाला जर स्वतःच्या आईचे दूध मिळत नसेल, तर त्या बाळाच्या आईच्या प्रकृतीशी साधर्म्य असलेली, चांगल्या संस्कारामधील दाईच्या दुधाची सोय करावी. ह्युमन मिल्क बँकमधील दुध हे निर्जंतुक केलेले असते. क्षत, हिपॅटायटिस बी, सिफीलीस हे आजार दात्या आईला नाहीत ना याची तपासणी करून पडताळणी केली जाते. भारतामध्ये अशा ८ बँका स्थापित झाल्या आहेत. ग.ग. हॉस्पीटल, कामा सी.एस.टी., तसेच पुण्यात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात ह्युमन मिल्क बँक आहेत. बाळाला जीवदान मिळण्यासाठी जेव्हा गरज असेल त्या वेळी या दुधाचा वापर करावा.

सरकारने बाळासाठी आईचे दूध श्रेष्ठ असल्या मुळे नोकरी करणाऱ्या महिलांना पगारी रजा मंजूर केली आहे. तरीसुद्धा खासगी नोकरी करणाऱ्यांना, तसेच सहा महिन्यांनी सरकारी नोकरीतील स्त्रियांनी आपल्या बाळाला आईचेच दूध मिळण्यासाठी मात्र उपाययोजना करावी.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# विद्यार्थिनींनो निर्भीड राहा, निर्भय बना

## डॉ. स्वाती बार्नबस यांचे प्रतिपादन; सीएसआरडीमध्ये ‘निर्भय कन्या अभियाना’ अंतर्गत कार्यशाळा

नगर – महाविद्यालयीन युवती हे देशाचे भविष्य आहेत. त्यांना फक्त शिक्षण देऊनच नव्हे, तर त्यांची सामाजिक, मानसिक व शारीरिक सक्षमता वाढवणे हे महत्त्वाचे आहे. अशा कार्यशाळा त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देतात तसेच त्यांच्यात आत्मनिर्भरता निर्माण करतात. समाजकार्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींनी निर्भय बनले पाहिजे असे मत यावेळी आयएमएस महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस यांनी व्यक्त केले.


सीएसआरडीमध्ये ‘निर्भय कन्या अभियाना’ अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व बीपीएचई सोसायटीचे सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी विद्यार्थी कल्याण मंडळामार्फत ‘निर्भय कन्या अभियाना’ अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असणाऱ्या डॉ. स्वाती बार्नबस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

व्यासपीठावर प्रमुख व्याख्यात्या डॉ. प्रणोती तेलोरे तसेच सीएसआरडी संस्थेचे डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. जेमोन वर्गीस, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.आसावरी झपके आणि प्रा.वैशाली पठारे उपस्थित होते.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात डॉ. प्रणोती तेलोरे यांनी स्त्रीवाद आणि सामाजिक न्याय या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी स्त्रीवादाची व्याख्या, त्यामागची तत्त्वे आणि सामाजिक न्यायाच्या संदर्भातील स्त्रियांच्या हक्कांची माहिती विद्यार्थिनींना दिली. त्यानंतर Prevention of Sexual Harassment (POSH) कायद्यावर आधारित संवाद साधून त्यांनी कायद्याचे महत्व, त्यातील तरतुदी आणि विद्यार्थीनींनी भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी त्याचा कसा उपयोग करता येईल हे स्पष्ट केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात अ‍ॅड. अनुराधा येवले यांनी महिला सुरक्षितता आणि सायबर सुरक्षा या महत्त्वाच्या विषयावर विद्यार्थिनींसोबत संवाद साधला. त्यांनी महिलांवरील अत्याचार, शोषण आणि सायबर गुन्ह्यांपासून महिलांनी स्वतःचे संरक्षण कसे करावे याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. तसेच हुंडाबळी प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक हिंसाचार कायदा, पोस्को कायदा यांसारख्या महत्त्वाच्या कायद्यांची माहिती देऊन त्याचा योग्य वेळी उपयोग कसा करावा हेही समजावून सांगितले.

दुपारच्या सत्रात डॉ. मनीषा पुंडे यांनी विद्यार्थिनींना स्वंरक्षणाचे धडे देत प्रत्यक्ष सराव करवला. त्यांनी महिलांनी संकटाच्या वेळी निर्भयपणे वागावे व स्वतःचा बचाव स्वतःच करावा या दृष्टिकोनातून महत्त्वाचे कौशल्य विद्यार्थिनींना शिकवले.

कार्यशाळेच्या समारोप सत्रात डॉ. विजय संसारे यांनी महिलांनी सामाजिक जीवनात निर्भयतेने आणि आत्मविश्वासाने कसे वावरावे यावर विद्यार्थिनींसोबत संवाद साधला. त्यांनी महिलांच्या जबाबदाऱ्या, हक्क आणि कर्तव्ये याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रा. आसावरी झपके यांनी कार्यक्रम आयोजनाची पार्श्वभूमी सांगितली, त्या म्हणाल्या कि, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळामार्फत विद्यार्थिनींसाठी प्रत्येक महाविद्यालय स्तरावर निर्भय कन्या अभियान राबविले जाते. या अंतर्गत आतापर्यंत अनेक उपक्रम राबविले गेले आहे. महाविद्यालयीन युवतींना या अभियानाचा फायदा होत असून त्या खऱ्या अर्थाने सक्षम होण्यास मदत होत आहे.

आभार प्रा.वैशाली पठारे यांनी मानले तर सीएसआरडीच्या विद्यार्थिनी पूजा दंतराव, तन्वी देशमुख, अश्विनी भोसले, साक्षी भांगे, वृषाली गारोळे, सायली कवाणे, रोझना जोसेफ व आशा मिंज यांनी कार्यशाळेच्या विविध सत्रात सूत्रसंचालन केले. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना केवळ कायद्यांची माहितीच नव्हे, तर समाजातील अडथळ्यांवर मात करत निर्भयतेने व सशक्तपणे आयुष्य जगण्याची प्रेरणा मिळाली. महिला सशक्तीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत या कार्यशाळेने विद्यार्थिनींना त्यांची जबाबदारी आणि समाजातील भूमिका अधिक प्रभावीपणे समजावून दिली असा अभिप्राय विद्यार्थिनी व्यक्त केला. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सीएसआरडीच्या विद्यार्थी कल्याण अधिकारी आसावरी झपके यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.


एकदंत कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर येथे श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने गणेश जयंती निमित्ताने नगर शहरातील विविध १४ शाळेतील १०० गरजू विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले.

# श्री एकदंत गणेश मंडळाच्यावतीने १०० गरजू विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

नगर – एकदंत कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर येथे श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने गणेश जयंती निमित्ताने नगर शहरातील विविध १४ शाळेतील १०० गरजू विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले. श्री गणेश जयंती निमित्ताने एक पाऊल.... गरजू विद्यार्थ्यांसाठी.... शैक्षणिक मदत... हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये नगर शहरातील महंत पंडित सूच्चासिंग विद्यालय, जानकीबाई आपटे मतिमंद शाळा, मार्कंडेय विद्यालय, गांधी मैदान, महर्षी ग. ज. चीतांबर विद्या मंदिर, सबजेल चौक, शारदा मंदिर, मार्कंडेय विद्यालय, श्रमिक नगर, संस्कृती कनोरे विद्यालय, कै. वी. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळा, मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालय, दादा चौधारी विद्यालय, सिताराम सारडा महाविद्यालय, प्रगत विद्यालय, बत्तीन पोट्यान्ना प्राथमिक शाळा, महिला मंडळ बालक मंदिर या १४ शाळेतील १०० गरजू विद्यार्थ्यांना दप्तर देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक सौ.विनोदा बेत्ती यांनी तर सुत्रसंचालन रोशन सुंकी यांनी केले. सौ.कविता मंचे यांनी आभार मानले.



## राष्ट्रपतींनी केले डॉ. दीपक हरके यांना सन्मानित

अहमदनगर मधील ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके यांना राष्ट्रपतीं श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी नवी दिल्लीतील कर्तव्यपथ येथे प्रजासत्ताकदिनी झालेल्या संचलन सोहळ्यात विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित केले होते. याबरोबरच राष्ट्रपतीं श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी बी के डॉ. दीपक हरके यांच्यासह त्यांचे सहकारी बी के सूर्या भाई, बी के गीता दीदी, बी के सतेंदर भाई, बी के विकासभाई व बी के बसंत भाई यांना भेटीसाठी राष्ट्रपती भवनातील त्यांच्या कार्यालयात भेटीसाठी वेळ दिला व संवाद साधला. या वेळी राष्ट्रपतींनी बी के डॉ. दीपक हरके यांना शाल परिधान करून त्यांचा सत्कार केला.

# हाजी हमीद रहेमतुल्ला दर्गाचा ४०० व्या संदल उरुस उत्साहात साजरा

### राजाभाऊ कोठारी महाराज यांच्या हस्ते चादर अर्पण, धार्मिक एकतेचा संदेश देवून शांती, सद्‌भावना व समृध्दीची प्रार्थना

नगर – सावेडी, हडको येथील हाजी हमीद रहेमतुल्ला दर्गाचा ४०० वा संदल उरुस उत्साहात साजरा करण्यात आला. संदल उरुस निमित्त दर्गात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दर्शनासाठी सर्व धर्मिय भाविकांनी गर्दी केली होती.

दर्गाच्या मजारवर राजाभाऊ कोठारी महाराज यांच्या हस्ते चादर अर्पण करून शांती, सद्भावना व समृध्दीची प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी साबीर अली सय्यद, दीप चव्हाण, दादाभाऊ कळमकर, विजय औटी, नागपूर येथील सेवानिवृत्त सेल्स टॅक्स कमिशनर वर्मा, जितेंद्र निखारे, अमित खामकर, राहुल जाधव, काका शेळके, मनिष सर, रवी बोरा, सिध्दार्थ आंधळे, रितेश महेश मध्यान, संजय घुले, गालीब अली सय्यद, जैद अली सय्यद, निसार अली सय्यद, मोहंमद अली सय्यद, रहेबर अली सय्यद, रजा सय्यद, बिलाल सय्यद, शहा सय्यद, योगेश सोनवणे, बाबू मध्यान, महिंद्र तिवारी, मौलाना रईस, अ‍ॅड. प्रज्ञा तळेकर, अ‍ॅड. विशाखा पाटील, आसिफ अली, नदीम अली, अकबर अली, मेहंदी सय्यद आदींसह भाविक व परिसरातील नागरिक उपस्थित होते.


हाजी हमीद रहेमतुल्ला दर्गाचा ४०० व्या संदल उरुस उत्साहात साजरा करण्यात आला.

राजाभाऊ कोठारी म्हणाले की, सर्वांना बरोबर घेऊन इस्लाम धर्माच्या शिकवणीप्रमाणे या दर्गाचा संदल उरुस पार पडत आहे. भारतात विविध जाती धर्म एकमेकांचा सन्मान राखून आनंदी जीवन जगत आहे. रंग, रुप वेगवेगळे असले, तरी एकाच ईश्वराची सर्व भक्ती करत असल्याचे त्यांनी सांगितले. तर धार्मिक एकतेने साजरा होणाऱ्या या दर्गाच्या संदल-उरुसचे त्यांनी कौतुक केले.

साबीर अली सय्यद यांनी दरवर्षी हाजी हमीद रहेमतुल्ला दर्गाचा संदल उरुस धार्मिक एकतेचा संदेश देऊन साजरा होत असतो. माणुसकी हीच ईस्लाम धर्माची शिकवण असून, सर्व मुस्लिम बांधव इतर धर्माचा मान-सन्मान राखून बंधू भावाने राहत आहे. सुफी-संतांची परंपरा असलेल्या आपल्या मातीने संपूर्ण देशाला एकात्मतेची शिकवण दिलेली आहे. हाच वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. दर्गाला संदल व चादर अर्पणाच्या कार्यक्रमानंतर भाविकांना लंगरचे वाटप करण्यात आले. तर दुसऱ्या दिवशी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

# जातीभेद नष्ट करण्यासाठी माणसातील माणूस जागृत करण्याचे महान कार्य भगवान श्रीचक्रधर स्वामींनी केले

### उद्धवराजदादा वाकीकर यांचे प्रतिपादन; भिंगार येथील महानुभाव पंथ मंदिरात भगवान श्रीचक्रधर स्वामी यांचा पदस्पर्श पावन दिन सोहळा उत्साहात

नगर – माणसाला माणूस जगण्यासाठी स्वामींनी सर्वांना समान न्याय देण्याचे कार्य केले. आजची स्थिती पहाता माणूस माणसासारखा दिसत असला तरी त्याच्या आत काय आहे हे जाणले पाहिजे. जातीभेद नष्ट करण्यासाठी माणसातील माणूस जागृत करण्याचे महान कार्य भगवान श्रीचक्रधर स्वामींनी बाराव्या शतकात केले, असे प्रतिपादन महानुभाव पंथाचे वांबोरी आश्रम ातील उद्धवराजदादा वाकीकर यांनी केले.

भिंगार येथील महानुभाव पंथ मंदिरात भगवान श्रीचक्रधर स्वामी यांचा पदस्पर्श पावन दिन सोहळा उत्साहात झाला. याप्रसंगी ते बोलत होते. पहाटे स्वामींच्या पवित्र महास्थानास चंदनाउटी महाभिषेक करण्यात आला. त्यानंतर गीतापाठ झाला. पंकज शेलार व आणूषा शेलार यांच्या हस्ते श्रीदत्त पालखी पुजन करण्यात आले. यावेळी पालखीची भिंगार परिसरातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. अभियंता रमेश शिदोरे यांच्या हस्ते महानुभाव ध्वजाचे ध्वजारोहण करुन प्रार्थना करण्यात आली. प्रारंभी मंदिरांचे मुख्य पुजारी सुदामराज बीडकर यांनी स्वागत केले.


भिंगार येथील महानुभाव पंथ मंदिरात भगवान श्रीचक्रधर स्वामी मंदिरात पदस्पर्श पावन दिन सोहळ्याचे दीपप्रजुराने उद्‌घाटन अ‍ॅड. बाबासाहेब रणशिंग व महानुभाव साधूसंत व महंत सर्वश्री संतराजबाबा पंजाबी यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया – समीर मन्यार)

धर्मसभेचे उद्‌घाटन दीप प्रज्वलनाने अ‍ॅड. बाबासाहेब रणशिंग यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महानुभाव साधूसंत व महंत सर्वश्री संतराजबाबा पंजाबी, दीपक राज शास्त्री, संतराज मूवी, प्रसाददादा महानुभाव, अजितदादा महानुभाव, दिलीपदादा महानुभाव, राजेशमुनी महानुभाव, कुलदीप दादा महानुभाव, राजधरबाबा महानुभाव, सुचितदादा पाथ्रीकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना उद्धवराजदादा वाकीकर म्हणाले की भगवंतांने जग निर्माण केले. मग येथे जातीभेद कशासाठी? माणूस माणूसच बनला तरच तो सुखी होतो. यासाठी बालपणापासून मुलांवर सुयोग्य संस्कार केले पाहिजेत. माता जिजाऊंनी शिवरायांना साधूसंतांच्या गोष्टी सांगून दृष्टी दिली. त्यामुळेच शिवराय घडले. अशा थोर पुरुषांचा आदर्श आपल्यापुढे ठेवला पाहिजे. त्यांचे विचार आत्मसात केले पाहिजेत. चिंतन पठण केले पाहिजे. आपण जसे वागतो त्याचे अनुकरण मुलं करतात. आपण कोणत्या गोष्टीचा कसा उपयोग करतो त्यावर विचार अवलंबून असतो. परमेश्वराचा आचार महत्वाचा आहे. तनावातून बाहेर पडण्यासाठी परमेश्वराचे स्मरण, चिंतन महत्त्वाचे आहे. परमेश्वराला शरण जाण्याची भावना निर्माण झाली पाहिजे. जीवनाचे सार माणूस बनणे आहे. तोच पुढे साधूसंत होतो असे ते म्हणाले.

विलास परांडेकरबाबा प्रास्ताविक करताना म्हणाले की, भगवान चक्रधर स्वामींची महाराष्ट्र ही कर्मभूमी आहे. ते विहार करत भिंगारच्या मंदिरात पौष वद्य द्वादशी शके ११९२ रोजी आले. त्यांचे ३५ दिवस या मंदिरात वास्तव्य होते. स्वामीच्या येथील अनेक लिळा प्रसिध्द आहेत, असे ते म्हणाले.

दु:ख निवारण करण्याचे मंदिर हे पवित्र स्थळ आहे असे सांगून पंजाबी बाबांनी मंदिराची महती सांगितली.

शरीर भिन्न असली तरी आत्म्याचे तत्व एकच असते. ईश्वरी अवतार धारण करायला लावणाऱ्या आपल्या भूमीत माणसाने माणसासारखे वागून सर्वांना सुखी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जग जोडण्या आधी माणूस जोडावा लागतो असे दिपकराज शास्त्री यांनी सांगितले.

आजच्या सरकारने महानुभाव पंथाकडे विशेष लक्ष दिले आहे. शासन दरबारी श्री चक्रधर स्वामी जयंती सुरू केली. महानुभाव पंथीय मंदिरांचे रस्ते हायवेला जोडण्यासाठी व विकासासाठी ५६८ कोटी रुपये मंजूर केले. याबद्दल अ‍ॅड. रणशिंग यांनी धर्मसभेत महानुभाव पंथाच्या वतीने सरकारचे अभिनंदन केले. वाघ यांनी आभार मानले.


सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा पतसंस्थेच्या चेअरमनपदी समीर बोरा, व्हाई चेअरमनदी अभय पितळे यांची निवडबद्दल मोची गल्ली असोसिएशनतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुन्ना चुडीवाले, लियाकत चुडीवाले, शकूर शेख, मयूर गोयल, ईश्वर पवार, महेंद्र गोयल, शफी रंगरेज, संजय हंकारे, अरमान चुडीवाले, बाबूभाई चुडीवाले, गणेश, इकबाल शेख, हमजा शेख आदी.

# माजी सैनिकांच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी

नगर –अखिल भारतीय पुर्व सैनिक सेवा परिषद अहिल्यानगरच्या वतीने जिल्हा अध्यक्ष भाऊसाहेब वाबळे यांच्या मार्गदर्शनाने भारतीय राष्ट्रीय सैन्याचे आद्य संस्थापक महानायक स्व.नेताजी सुभाषचंद्र बोस यांची १२८ वी जयंती साजरी करण्यात आली.


महानायक स्व.नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना अखिल भारतीय पुर्व सैनिक सेवा परिषदचे जिल्हा अध्यक्ष भाऊसाहेब वाबळे. (छाया – बबलू शेख)

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऑन. लेफ्टनंट सदाशिव भोळकर होते, आखिल भारतीय पुर्व सैनिक सेवा परिषद अहिल्यानगर सदस्यांच्या वतीने नेताजींच्या स्मरणार्थ कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कार्यक्रम आयोजीत केला होता. गौरीघुमट, लक्ष्मी कारंजा येथील संघ कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे सुरेश ऊर्फ नानासाहेब जाधव (महाराष्ट्र प्रांत संघसंचालक) यांनी नेताजींच्या जिवनावर संक्षिप्त पणे प्रकाश टाकला. प्रमुख वक्ते देवीराम तुळशीराम धुलीया यांनी ही उत्तम प्रबोधन केले. कार्यक्रमाचे व्यवस्थापन संघटन सचिव राजेश देशपांडे व सदस्य सुभाष सूर्यवंशी यांनी केले.

या प्रसंगी ज्ञानदेव कासार, भगवान कोल्हे, श्री. फरतडे, श्री. हासे यांच्या सह माजी सैनिक उपस्थित होते.

# अल्ट्राकेअर हॉस्पिटलतर्फे मोफत सर्व रोग निदान शिबीर

नगर – डिएसपी चौक टॉप-अप पेट्रोल पंपासमोर फकीरवाडा येथे अल्ट्राकेअर हॉस्पिटल येथे माजी नगरसेवक शेख मुदसर अहमद इसहाक मित्र मंडळ यांच्यातर्फे मोफत सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यात हृदयरोग, बालरोग, स्त्रीरोग, मधुमेह, पाठ मान, गुडघे, कान, नाक, घसा, पोट आदी विकार आजारांची सुमारे २५० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तसेच थायरॉईड, उच्च रक्तदाब, मधुमेह, लिव्हर विकार काविळ, फुफ्फुसाचे विकार, दमा, निमोनिया, संसर्गजन्य आजार डेंग्यु मलेरीया, एच.आय.व्ही, किडनीची टेस्ट, कॅन्सरचे टेस्ट, सिरम कॅल्शियम, शुगर, हिमोग्लोबीन आदीची तपासणी संपूर्ण सुरक्षा केंद्र, जिल्हा रुग्णालय अ.नगर यांच्यामार्फत मोफत करण्यात आली.


अल्ट्राकेअर हॉस्पिटल येथे मोफत सर्व रोग निदान शिबीरामध्ये रुग्णांची तपासणी करताना तज्ज्ञ डॉक्टर.

शिबिरास डॉ. रियाज शेख, डॉ. अहद शेख, डॉ.सुरेंद्र पिंपरकर, डॉ.आलिया शेख, डॉ. बाविस्कर, डॉ.हसीना मुदस्सर शेख आदी सह तज्ञ डॉ. उपस्थिती होते. या शिबिराचे आयोजन करण्यासाठी अर्पिता दाते, आरबाज शेख, विनय इथे, सागर फुलारी, दीपक चौरे, आदित्य करपे, अतिफ शेख, फारुख शेख, गौरव डाके आदींनी परिश्रम घेतले.


दहा विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन संपूर्ण शैक्षणिक खर्च उचलल्याबद्दल हाजी शाहबाज सय्यद यांचा सत्कार करताना खा. निलेश लंके. समवेत माजी नगरसेवक योगीराज गाडे आदी.

# शैक्षणिक खर्च उचलल्याबद्दल हाजी शाहबाज सय्यद यांचा सत्कार

नगर – प्रजासत्ताक दिनानिमित्त मुकुंदनगर येथील यशवंत माध्यमिक विद्यालय येथे प्रजासत्ताक दिनाचा सोहळा झाला. यप्रसंगी खासदार निलेश लंके व माजी नगरसेवक योगीराज गाडे उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे हाजी शाहबाज सय्यद यांनी सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील १० विद्यार्थ्यांना दत्तक घेतल्याचे जाहीर केले व २०२५-२६ चा संपूर्ण शैक्षणिक खर्च उचलण्याचा निर्णय घोषित केला. त्यांच्या या उपक्रमाचे शाळा व्यवस्थापनासह स्थानिक नागरिकांनी कौतुक करत खासदार निलेश लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. बनकर एस. के. यांनी देखील हाजी शाहबाज सय्यद यांचे आभार मानले.

# करियर कट्टा अंतर्गत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये अहमदनगर महाविद्यालयास ३ पुरस्कार प्राप्त

नगर – महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त, विद्यमाने करिअर कट्टा यांच्या माध्यमातून हा पुरस्कार दिला जातो. यंदा हा पुरस्कार अहमदनगर महाविद्यालयास देण्यात आला.


प्रा.डॉ. भागवत परकाळ

राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये अहमदनगर महाविद्यालयास तीन पुरस्कार प्राप्त झाले. या मध्ये उत्कृष्ट राज्यस्तरीय तालुका समन्वयक प्रथम पुरस्कार प्रा.डॉ. भागवत सुखदेव परकाळ मिळाल आहे. या वर्षी पुणे विभाग राज्यस्तरीय महाविद्यालय स्पर्धेचे सादरीकरण ऑनलाईन मोडने घेण्यात आले. यामध्ये एकूण २६ महाविद्यालयाने सहभाग नोंदवला. या स्पर्धेचा निकाल २६ जानेवारी रोजी घोषित करण्यात आला. यामध्ये अहमदनगर महाविद्यालयास तीन पुरस्कार प्राप्त झाले. १. अहमदनगर महाविद्यालयास शहर विभागातून जिल्हा स्तरावरील प्रथम पुरस्कार, २. उत्कृष्ट राज्यस्तरीय तालुका समन्वयक प्रथम पुरस्कार प्रा.डॉ. भागवत सुखदेव परकाळ प्रथम क्र., ३. उत्कृष्ट तालुका समन्वयक प्रा.डॉ. भागवत सुखदेव परकाळ जिल्हा स्तरावरील द्वितीय क्र. असे पुस्कार प्राप्त झाले.

# ‘श्री समर्थ विद्या प्रसारक’तर्फे ‘समर्थ सूर्यनमस्कार सोहळा’

**१ हजार विद्यार्थी करणार ११ सूर्यनमस्कार व ११ मनाच्या श्लोकांचे सामूहिक पठण; मुकुंदकाकांना मानाचा समर्थ पुरस्कार जाहीर**

नगर– विद्यादानाचा यशस्वी सुवर्ण महोत्सव साजरा करणाऱ्या श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दास नवमी, रथसप्तमी व जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त आरोग्यदृष्ट्या संपन्न व समृद्ध विद्यार्थी घडविण्यासाठी सावेडीतील नवीन समर्थ प्रशालेच्या प्रांगणावर हजारो विद्यार्थी श्री समर्थ रामदास स्वामीकृत ११ मनाचे श्लोक म्हणत ११ सूर्यनमस्कार घालण्यात येणार आहेत तसेच दासनवमीनिमित्त मंडळाचे आधारस्तंभ स्व.दत्तात्रेय रामचंद्र कुलकर्णी (श्री डी.आर.सर) यांच्या स्मरणार्थ समर्थ विचारांच्या प्रचार व प्रसारार्थ देण्यात येणारा मानाचा समर्थ पुरस्कार धर्मशास्त्र अभ्यासक मुकुंदकाका जाटदेवळेकर यांना जाहीर झाला आहे, अशी माहिती दासनवमी उत्सव समिती प्रमुख व मंडळाचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी दिली.


श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने समर्थ सूर्यनमस्कार सोहळ्याची माहिती दासनवमी उत्सव समिती प्रमुख व मंडळाचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी दिली. समवेत सुरेश क्षीरसागर, सुनील जोशी, मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर. (छाया – उदय जोशी)

‘बनवू समर्थ अन निरामय आयुष्य व आरोग्य हाच खरा महामंत्र’ असे उपक्रमाचे घोषवाक्य असून ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता सहकारनगर येथील नवीन प्रशालेच्या प्रांगणावर मंडळाच्या शाळांमधील १ हजार विद्यार्थी योग विद्या धामच्या माध्यमातून सूर्यनमस्कारांची पर्वणी साधणार आहेत.

सुमारे ५६ वर्षांपासून मंडळाच्या वतीने दासनवमीनिमित्त श्री रामदास स्वामी यांच्या विचाराचे प्रचार–प्रसाराचे काम अविरत चालू आहे. त्याचबरोबर शालेय स्तरावर पाठांतर, हस्ताक्षर, वक्तृत्व, निबंध, चित्रकला आदी विविध स्पर्धांमध्ये शहरातील हजारो विद्यार्थी व अनेक शाळा यात सहभागी होत असतात तसेच खुल्या गटात वक्तृत्व व निबंध स्पर्धा या समर्थ अभ्यासकांना समर्थ विचार प्रकट करण्यासाठी संस्था एक व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. श्री समर्थांच्या साहित्यावर आधारित समर्थ विचार अभ्यासकांची दर्जेदार व्याख्याने देखील दासनवमीच्या निमित्ताने प्रतिवर्षी आयोजित केली जातात. २२ फेब्रुवारी रोजी दासनवमी उत्सवात जाटदेवळेकर महाराज यांचे सुश्राव्य प्रवचन होणार असून या सोहळ्यात त्यांना समर्थ पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष भा. ल. जोशी, उपाध्यक्ष दीपक ओहोळ, सचिव सुरेश क्षीरसागर, सचिव प्रभाकर ओहोळ, खजिनदार संजय कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य ॲड. किशोर देशपांडे, विकास सोनटक्के, ॲड. वेद देशपांडे, सचिन क्षीरसागर, संध्या कुलकर्णी, निमंत्रित सदस्य स्वप्निल सोनटक्के आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे.

मुख्याध्यापिका वसुधा जोशी, प्राचार्या संगीता जोशी, माध्यमिक विभाग पर्यवेक्षक सुनील कानडे, मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर व मुख्याध्यापक अजय महाजन तसेच सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपक्रमासाठी परिश्रम घेत आहेत.

# १ व २ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे प्रसूती आरोग्याविषयी राष्ट्रीय परिषद

**सुरक्षित प्रसूती तसेच कायद्यांविषयी स्त्रीरोगतज्ज्ञांना मार्गदर्शन**

शिर्डी – फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनेकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (FOGSI) अर्थात भारतीय स्त्रीरोगतज्ञ आणि प्रसूतीतज्ञ संघटनांचे महासंघ व अहिल्यानगर स्त्रीरोगतज्ञ आणि प्रसूतीतज्ञ संघ यांच्यावतीने अध्यक्ष डॉ. सुनिता तांदुळवाडकर यांच्या नेतृत्वाखाली शिर्डी येथे प्रसूती आरोग्याविषयी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. हाय–रिस्क ऑब्स्टेट्रिक्स: इनसाईड ओटी आणि कोर्ट या विषयावर परिषदेत चर्चा होणार असून महिलांच्या आरोग्याची जपणूक करण्यासाठी ते महत्वपूर्ण ठरेल, अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. गणेश बडे यांनी दिली.

शिर्डी येथील सेंट लॉर्न येथे १ व २ फेब्रुवारी रोजी ही परिषद होणार आहे, मातृ आरोग्य हे FOGSI साठी सर्वात महत्त्वाचे असून संस्थेचा हेतू भारतभर महिला आरोग्याची गुणवत्ता सुधारण्याचा आहे. या परिषदेत सहभागी डॉक्टरांना अधिक धोका असलेल्या गर्भधारणेवरील उपचार तसेच डॉक्टरांच्या प्रॅक्टिसला जोखमीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी वैद्यकीय कायद्याच्या बाबतीत मार्गदर्शन करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.



डॉ. सुनिता तांदुळवाडकर यांनी सांगितले, की आम्ही मातृत्व आरोग्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याच्या प्रयत्नात आहोत. त्याचप्रमाणे स्त्रीरोगतज्ञांना वैद्यकीय व कायदेशीर अद्ययावत माहिती देणे हे देखील आमचे उद्दिष्ट आहे. या परिषदेसाठी निवडलेला विषय धोक्याच्या प्रसूतीकाळात महिलांचा जीव वाचवणे तसेच दरम्यान डॉक्टरांच्या प्रॅक्टिसला सुरक्षित ठेवणे ही दोन्ही उद्दिष्टे साध्य करणारा आहे. प्रत्येक स्त्रीरोगतज्ञाने केवळ वैद्यकीय कौशल्यातच प्रवीण असणे आवश्यक नाही, तर त्यांना कायदेशीर समज देखील असावी. हा द्विस्तरीय दृष्टिकोन रुग्णांची योग्य काळजी घेण्यास मदत करतो आणि डॉक्टरांच्या सुरक्षिततेची खात्री देतो.

परिषदेत FOGSI च्या पर्यावरण समिती, प्रॅक्टिकल ऑबस्ट्रेट्रिक्स समिती आणि मेडिकल–लीगल समिती सक्रियपणे सहभागी होणार आहेत. या समित्या अधिक धोका असलेल्या प्रसूतीच्या आव्हानांसोबतच स्त्रीरोगतज्ज्ञांना आपल्या प्रॅक्टिसमध्ये येणाऱ्या कायदेशीर अडचणींबाबत सल्ला देतील.

भारतीय स्त्रीरोगतज्ञ आणि प्रसूतीतज्ञ संघटनांचे महासंघ देशभरातील ४४ हजारपेक्षा जास्त स्त्रीरोगतज्ज्ञांचे प्रतिनिधित्व करते. महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी व प्रसूती क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. त्याअंतर्गत होणाऱ्या परिषदेचे आयोजन अध्यक्ष डॉ. गणेश बडे, सह–अध्यक्ष डॉ. सी.डी. मिश्रा, सचिव डॉ. अमित करडे, समन्वयक डॉ. ज्योत्स्ना डौले, सचिव डॉ. सुवर्णा होशिंग, डॉ. सोनाली वहाडणे, उपाध्यक्ष डॉ. प्रशांत झेंडे, डॉ. अशोक नरवडे, डॉ. रेणुका पाठक यांनी सर्व नियोजन केले आहे. त्यानुसार प्रसूतीच्या क्षेत्रातील नवीनतम तंत्रज्ञान आणि वैद्यकीय व कायदेशीर जबाबदाऱ्यांवर चर्चाही होईल. प्रमुख तज्ञ आणि वक्ते रिअल–लाईफ केस स्टडीज, नविन शस्त्रक्रिया तंत्रज्ञान आणि कायदेशीर परिस्थितीवर सखोल चर्चा करतील.

# ‘अनामप्रेम’ सेंटरच्या गणेश बावस्करची महाराष्ट्राच्या टी २० क्रिकेट संघात निवड

नगर – नॅशनल व्हीलचेअर क्रिकेट चॅम्पियनशिप टी२० या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा ग्वाल्हेर येथे पुढील महिन्यात होणार आहेत. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र व्हीलचेअर क्रिकेट असोसिएशनने महाराष्ट्राच्या संघाकडून खेळण्यासाठी अनामप्रेम स्पायनल कॉर्ड इंजुरी रिहॅब सेंटरचा लाभार्थी व कोऑर्डिनेटर गणेश बावस्कर याची निवड केली आहे. गणेशने नुकत्याच पार पडलेल्या व्हीलचेअर वनडे क्रिकेटमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत महाराष्ट्र संघाकडून सर्वात जास्त धावा केल्या होत्या. गणेशच्या निवडीचा अनामप्रेम परिवाराला सार्थ अभिमान आहे. गणेशला अनामप्रेमच्या स्पायनल कॉर्ड इंजुरी रिहॅब सेंटरमध्ये उपचारासाठी मागील वर्षी झोळीतून आणले होते, तोच गणेश महाराष्ट्राचे क्रिकेटमध्ये प्रतिनिधित्व करीत आहे. गणेश त्याच्या या यशाचे श्रेय डॉक्टर प्रकाश शेठ, डॉ. सुवर्णा गणवीर, विखे पाटील हॉस्पिटलमधील फिजिओथेरपी देणारे डॉक्टर आणि संपूर्ण अनामप्रेम परिवाराला देत आहे.



स्पर्धेसाठी अनामप्रेमचे डॉ. गिरीश कुलकर्णी, इंजि. अजित माने, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. मेघना मराठे, अनिल गावडे, डॉ.रविंद्र सोमाणी, सौ.राधा कुलकर्णी, प्रा.योगिता काळे, अभय रायकवाड, विष्णू वारकरी, उमेश पंडूरे, मुंजाजी गालफाडे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागात जीएसटी ‘सर्टिफिकेट कोर्स’ चे उद्घाटन

नगर – न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने राबविला जाणारा ‘सर्टिफिकेट कोर्स इन GST’ या अभ्यासक्रमाचे उद्घाटन उत्साहात पार पडले.



न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्यावतीने राबविला जाणारा ‘सर्टिफिकेट कोर्स इन GST’ या अभ्यासक्रमाचा उद्घाटन उत्साहात पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे तर प्रमुख पाहुणे म्हणून सी. ए. अमित पोखर्णा उपस्थित होते.

कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना GST संबंधित सखोल ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्ये प्रदान करण्याच्या उदेशाने या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे तर प्रमुख पाहुणे म्हणून सी. ए. अमित पोखर्णा उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सदर कोर्सेचे महत्व वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर यांनी विशद करतांना विद्यार्थ्यांनी पदवी बरोबर अनेक व्यावसायिक कौशल्य आत्मसात केली पाहिजेत असे सांगितले.

प्राचार्य डॉ. सागडे यांनी सांगितले की, GST अभ्यासक्रम हा महाविद्यालयाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी उपक्रम असून, यामुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक पातळीवर स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळेल असे ते म्हणाले.

सी. ए. अमित पोखर्णा यांनी GST च्या व्यावहारिक उपयोगावर भर देत सांगितले की, हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना कर प्रणालीतील नवनवीन संधी शोधण्यास आणि उद्योग क्षेत्राशी स्वतःला जोडण्यास सक्षम बनवेल.

कार्यक्रमात वरिष्ठ प्राध्यापक डॉ. बाळासाहेब मूर्तडक, डॉ. अतुल अडसुरे, प्रा. स्नेहल बनकर, प्रा. परशुराम काळे, प्रा. सोनाली कसबे, प्रा. गायत्री माणिक, प्रा. विठ्ठल पटारे, प्रा. किशोर ताके, प्रा. वैभव सुंबे यांची महत्त्वपूर्ण उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सी. ए. निखिल गोयल यांनी केले. त्यांनी GST अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकत सांगितले की, विद्यार्थ्यांना GST च्या माध्यमातून व्यावसायिक जगात आपले स्थान निर्माण करण्याची संधी मिळेल असे सांगितले. आभार प्रदर्शन प्रा. अदिती सांगळे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

# उज्जैन श्री महाकालेश्वर मंदिरास नगरच्या व्यापाऱ्याकडून २ किलो चांदीचे मुकुट

**अहिल्यानगर शहरातील भाविकांची उपस्थिती; शहरात साकारण्यात आले शास्त्रोक्त पद्धतीसह उत्तम नक्षीकाम असलेले मुकुट**

नगर – शहरातील आडत व्यापारी गणेश रामदास लालबागे व मोनिका लालबागे दांम्पत्यांनी उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिरास २ किलो वजनाचा चांदीचा मुकुट अर्पण केला. महाकालेश्वर मंदिरात विधीवत पुजा करुन लालबागे परिवाराने महाकाल बाबांसाठी चांदीचा मुकुट देण्यात आला आहे. मंदिराचे मुख्य पुजारी गुरू प्रदीप शर्मा यांच्या उपस्थितीत लालबागे परिवाराच्या हस्ते मुकुट व शृंगार आरती पार पडली.


शहरातील आडत व्यापारी गणेश लालबागे व मोनिका लालबागे दांम्पत्यांनी उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिरास २ किलो वजनाचा चांदीचा मुकुट अर्पण केला. याप्रसंगी मंदिराचे मुख्य पुजारी गुरू प्रदीप शर्मा यांच्या उपस्थितीत लालबागे परिवाराच्या हस्ते मुकुट व शृंगार आरती पार पडली.

याप्रसंगी वेदांत लालबागे, विहान लालबागे, संतोष कानडे, संदीप कटारिया, संदीप गुजर, विक्रांत कानडे, निकेश गाडळकर, सुरेश लालबागे, विशाल भगत, साई बोरुडे, राजकुमार मुनोत, अशोक गर्जे, महेश कोतकर, राजू शिकरे, लक्ष्मण (आबा) कचरे, प्रकाश भागानगरे, विनय सेहगल, निकेतन नवले, गणराज मेहत्रे, ऋतिक बालवडकर आदींसह शहरातील भाविक उपस्थित होते.

बजरंग काशिनाथ गुरव यांनी महाकालेश्वर बाबांच्या मुर्तीसाठी उत्कृष्ट कारीगरी करुन मुकुट साकारले आहे. शास्त्रोक्त पद्धतीने चांदीचा मुकुट बनविण्यात आलेला असून, उत्तम पध्दतीने नक्षीकाम करण्यात आले आहे.

लालबागे परिवाराची महाकालेश्वर बाबांवर मोठी श्रध्दा असून, या श्रध्देपोटी मुकुट अर्पणाचा स्वप्न साकारले गेले असल्याची भावना गणेश लालबागे यांनी व्यक्त केली.

# ‘सुरवी सोलर सिस्टिम्स’ने पटकावले दोन पुरस्कार

नगर – नुकत्याच पार पडलेल्या सोलर क्वार्टर स्टेट लीडरशिप अवॉर्ड २०२५ (महाराष्ट्र) मध्ये अहिल्यानगर येथे स्थित सुरवी सोलर सिस्टिम्स यांनी दोन पुरस्कार पटकावले आहेत. सोलर EPC कंपनी ऑफ द ईयर – इंडस्ट्रियल रूफटॉप सोल्यूशन (डायमंड), बेस्ट प्रोजेक्ट ऑफ द ईयर – इंडस्ट्रियल हा गौरव महाराष्ट्र शासनाचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज शैलेश राजपूत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



सोलर क्वार्टर स्टेट लीडरशिप अवॉर्ड २०२५ (महाराष्ट्र) मध्ये सुरवी सोलर सिस्टिम्सला दोन पुरस्कार गौरविण्यात आले.

अवघ्या नऊ वर्षांतच भारतातील आघाडीच्या सोलर EPC कंपन्यांमध्ये स्थान मिळवण्यात यशस्वी ठरली आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतभर कंपनीचे सौर प्रकल्प सुरू आहेत. २०२४ मध्ये नऊ लाख स्क्वेअर फूटांहून अधिक सौर पॅनेल्स बसवल असून, १५० हून अधिक औद्योगिक प्रकल्पांना करोडो रुपयांची वीजबचत करण्यास मदत केली आहे. कंपनीचे मॅनेजिंग पार्टनर संजोग गुगळे आणि दिगंबर हरीशचंद्रे या यशाचे संपूर्ण श्रेय त्यांच्या मेहनती टीमला आणि विश्वासू ग्राहकांना देतात.

या महत्त्वाच्या विजयावर बोलताना संजोग गुगळे म्हणाले, महाराष्ट्र आमचा बालेकिल्ला आहे. मात्र, आमच्या उत्कृष्ट सेवा संपूर्ण भारतभर पोहोचवण्याचा आमचा मानस असून, त्यादिशेने आमचे प्रयत्न सुरू आहेत.

# नगरचे कलाकार हेमंत दंडवते यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हिंदी गौरव स्फूर्तीगीत लिहिले व चित्रध्वनीमुद्रण गाणे गायिले

नगर – २६ जानेवारी प्रजासत्ताक दिना निमित्त अहिल्यानगर येथील सुरसंगम संगीत प्रस्तूत, ’ओम जय जगत’ या शीर्षकखाली नगरचे कलाकार हेमंत दंडवते यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हिंदी गौरव स्फूर्तीगीत लिहिले व आपल्या आवाजात चित्रध्वनीमुद्रण गाणे गायिले.




या गीतात साधुसंत, राष्ट्रवीर, भारतीय सैनिक यांच्या शौर्यगाथेचं वर्णन करणारं आहे, सर्वधर्म समभाव, प्रत्येकाला भारतीय होण्याचा अभिमान आणि प्रेरित करणारं हे स्फूर्तीदायक देशभक्ती गीत. या गीता मध्ये वापरलेली शब्दांची गोडी, धुन, ताल आणि राग अतिशय छान असून या गाण्यातून पंतप्रधान मोदी यांच्या कार्याची प्रेरणा, प्रशंसा, आत्मनिर्भर भारत असे व्यक्त केले आहे. विशेष निर्माते दंडवते यांनी त्यांच्या गीत चित्रमुद्रणामध्ये युगल नृत्यही सादर केले आहे, गाण्यातील त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकेल.

स्वातंत्र्यदिनाच्या आणि प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी हे गाणं आपल्या मनातील भावना व्यक्त करेल, हे चित्रफीत गीत दंडवते यांच्या युट्यूब चॅनलवर प्रसारित झाले असून ते श्रोत्यांना एक अविस्मरणीय अनुभव देत आहे. हे गाणे कॉपीराइटसाठी प्रक्रियेत आहे.

ज्येष्ठ संगीतकार सुनील महाजन यांनी गाणं संगीतबद्ध केले, सागर देशपांडे (सेव्हन डायमेंशन्स् स्टुडिओ) यांनी ध्वनीमुद्रण, ललित सुराणा (जित मोशन ग्राफिक्स्) यांचे चित्रमुद्रण व संपादन तर महर्षी ग.ज.चितांबर विद्या मंदिरच्या शिक्षिका प्राजक्ता जोशी, विद्यार्थिनी विद्या बुलाखे, दिव्या बुलाखे, अमृता बोरुडे यांनी कोरससाठी साथ दिली.

युगल नृत्य स्वस्तिका देशपांडे, मेकअप उदय वैद्य, वेशभूषा संजना ड्रेपरी. तसेच रजनी मुनोत, राजेंद्र छल्लानी, समर्थ उद्योगचे पंकज दाभाडे यांचे सहकार्य लाभले.

# ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्जाचा एकरकमी भरणा केल्यास व्याजावर ५० टक्के सवलत

नगर – महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण कर्ज रक्कमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के व्याज सवलत देण्याची योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक बाळू भोसले यांनी केले आहे.



सारसनगर येथील कै. दामोधर विधाते (मास्तर) प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर महाराष्ट्रातील संस्कृतीचे दर्शन घडविले.

# विद्यार्थ्यांना जीवनाची दिशा समजली, तर आयुष्याची दशा बदलेल

**शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांचे प्रतिपादन, विधाते विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात**

नगर – शैक्षणिक प्रवाह बदलत आहे. नवीन शैक्षणिक धोरण स्विकारुन पुढे जाण्याची गरज आहे. शालेय जीवनात पास–नापास व कमी गुण महत्त्वाचे नसून, विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतेने स्वतःला सिध्द करावे. शालेय जीवनातच विद्यार्थ्यांनी वेळेचे महत्त्व समजून घ्यावे. पारंपारिक शिक्षणापेक्षा जिवंत शिक्षण महत्त्वाचे ठरणार आहे. कौशल्य आत्मसात करुन स्पर्धेत उतरा. विद्यार्थ्यांना जीवनाची दिशा समजली, तर आयुष्याची दशा बदलेल, असे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी सांगितले.

सारसनगर येथील कै. दामोधर विधाते (मास्तर) प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर महाराष्ट्रातील संस्कृतीचे दर्शन घडविले. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक क्रांती घडविणारे जीवनपट विद्यार्थ्यांनी उलगडले. नृत्याविष्कारातून सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश देऊन, शेतकरी आत्महत्येचा ज्वलंत प्रश्न मांडला. विविध हिंदी–मराठी गाण्यावर रंगलेल्या नृत्याने सांस्कृतिक कार्यक्रमात रंग भरला होता.

सरस्वती पूजन करुन दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. लेझीम व बॅण्ड पथकाच्या निनादात पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. जि.प. माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी उप–महापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, शालेय संस्थेचे विश्वस्त बाळासाहेब विधाते, सरचिटणीस प्रा. शिवाजी विधाते, रामदास कानडे, मयूर विधाते, पद्मशाली प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के, संतोष सुसे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात लता म्हस्के यांनी शाळेच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के यांनी वार्षिक अहवाल सादर करून शाळेचा वाढता गुणवत्तेचा आलेख मांडला. परिचय भाऊसाहेब पुंड व सचिन बर्डे यांनी करून दिला. शाळेच्या ज्ञानसागर या चौदाव्या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. तर कला, क्रीडा, शैक्षणिक व विविध स्पर्धेत नैपुण्य मिळवणाऱ्या शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. लवकरच सेवानिवृत्त होत असलेले मार्कंडेय शाळेचे शिक्षक प्रा. शिवाजी विधाते यांचा बाळकृष्ण सिद्दम यांनी सत्कार करुन संस्थेसाठी त्यांचे नेहमीच सहकार्य मिळाले असल्याची भावना व्यक्त केली.

गणेश भोसले यांनी प्रभागातील विविध प्रश्न सोडवून शाळेच्या प्रवेशद्वार पर्यंत काँक्रिटीकरणाचे रस्ते निर्माण करुन देण्यात आले आहे. तर शाळे जवळच स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभे राहत असून, याचा खेळाडूंना लाभ होणार आहे. तसेच या प्रभागात म्युझिकल फाउंटन व मनपाचे अद्यावत हॉस्पिटल आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून साकारण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

गणेश वंदनाने सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. कोळी नृत्य व पोतराज नृत्यासह जागरण गोंधळाने कार्यक्रमाची रंगत वाढवली. तांडव नृत्याच्या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली, लगीन देवाच या नृत्य विष्कारातून खंडेरायाच्या विवाहाचा सोहळा घडविण्यात आला. आंम्ही शिवकन्या या गीतांमधून स्त्री शक्तीचे दर्शन घडविण्यात आले. अकेले हम, अकेले तुम..., माय भवानी..., बानू बानू..., कान्हा सोजा जरा... आदी गीतांवर सांस्कृतिक कार्यक्रम रंगले होते. विविध गीतांवर रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित पालक, विद्यार्थी व शिक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांच्या कला गुणांना दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल मेहत्रे, सारिका गायकवाड व निता जावळे यांनी केले. आभार सविता सोनवणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राधाकिसन क्षीरसागर, योगेश दरवडे, मिनाक्षी घोलप, श्रुती पेंटा आदींनी परिश्रम घेतले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## उंदीर देणार भूकंपाची पूर्वसुचना



वादळ, पाऊस, सुनामी वगैरे नैसर्गिक आपत्तींच्या पूर्वसूचना देता येऊ शकतात. मात्र भूकंप अचानकच होतात व त्याचे पूर्वानुमान करणे कठीण असते. मात्र, भूकंपाची पूर्वसूचना जंगली उंदीर देऊ शकतात, असे पेरू या देशातील संशोधनात दिसून आले आहे. जगात इ.स.१९०० पासूनच्या मोठ्या भूकंपांमध्ये १५ लाख लोक मरण पावले आहेत. मात्र, ही जीवित व वित्तहानी काही प्रमाणात टाळता येऊ शकेल, असे संशोधकांना वाटते. काही जंगली प्राणी त्याची सूचना देऊ शकतात. त्यात जंगली उंदरांचा समावेश आहे.

### भूकंप होणार असेल, तर ते आधी जंगली उंदरांना कळते

तीन उपखंडांतून पेरूतील भूकंपाबाबत मिळालेल्या माहितीनुसार भूकंप होणार असेल, तर ते आधी जंगली उंदरांना कळते. २०११ मध्ये अँडियन खेड्यात भूकंप झाला होता, त्या वेळी सात दिवस आधीच यानाचागा शेमिलेन नॅशनल पार्कमधील सर्व प्राण्यांनी पळ काढला होता व त्यांच्या हालचाली कॅमेऱ्याने टिपण्यात आलेल्या आहेत. हे सर्व प्राणी भूकंप होऊन गेल्यानंतर पुन्हा आले. संशोधकांच्या मते त्यांचे निष्कर्ष अंतिम नाहीत; पण त्यांच्या प्राथमिक अंदाजानुसार प्राण्यांना भूकंपाची पूर्वसूचना मिळत असते. वन्य प्राण्यांच्या हालचालींचा अभ्यास केला, तर आधीच भूकंपाची पूर्वसूचना मिळू शकते. भूकंपात भूगर्भातील दगडाचे थर हलतात व त्यामुळे विद्युतभार निर्माण होतो व जमिनीवरच्या पाण्यात तो येतो तसेच काही धनभारित आयन कमी उंचीच्या वातावरणात येतात. आयनभारित हवेमुळे प्राणी भूकंपाच्या आधी सैरभैर होतात व जास्त क्रियाशील होतात. त्यामुळे त्यांच्या हालचालींवरून भूकंपाचे पूर्वानुमान करता येते.

## मॅमथ हत्तींचा ऱ्हास परागकणांमुळे?

दहा हजार वर्षांपूर्वीपर्यंत या पृथ्वीतलावर महाकाय केसाळ हत्तीही वावरत होते. त्यांना वुली मॅमथ असे म्हटले जाते. शेवटच्या हिमयुगाच्या काळातील असे केसाळ हत्ती कोणत्या कारणांमुळे नष्ट झाले, याबाबत सातत्याने संशोधन होत असते. तत्कालीन मानवांनी केलेल्या बेसुमार शिकारीचा हा परिणाम असावा, असेही म्हटले जाते. आता एका नव्या संशोधनानुसार हिमयुगाच्या अखेरच्या काळात झाडा- झुडपांची मोठीच वाढ होऊ लागली. त्यावेळी मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आलेल्या परागकणांमुळे मॅमथची घ्राणेंद्रिये भरून गेली. त्यांच्या हासाचे परागकणांची ॲलर्जी व वास घेण्याची क्षमता गमावणे, हे मोठे कारण होते.




अर्थातच या नव्या संशोधनाबाबत अनेक संशोधकांनी मतभेद दर्शवले आहेत. मॅमथचा नैसर्गिक अधिवास असलेल्या अनेक गवताळ कुरणांमध्ये परागकणांचे जणू ढगच पसरले होते. या परागकणांनी मॅमथच्या सोंडेत प्रवेश करून श्वासमार्ग रोखला. त्यामुळे मॅमथ नष्ट झाले, असे या नव्या संशोधनात म्हटले आहे. शेवटच्या हिमयुगाच्या अखेरच्या काळात जगाचे तापमान वाढल्यावर अनेक वनस्पतींची मोठीच वाढ होऊ लागली. या वनस्पतींच्या फुलांमधील परागकणही मोठ्या प्रमाणात हवेत पसरू लागले.

त्यांच्यामुळे मॅमथसह अनेक प्राण्यांमध्ये ॲलर्जीक रिॲक्शन्स वाढू लागल्या. यामुळे त्यांची घ्राणेंद्रिये ब्लॉक होऊ लागली व वास घेण्याची क्षमता अशी नष्ट झाल्याने त्यांना एकमेकांशी सामान्यपणे संवाद करणे कठीण झाले. त्याचा परिणाम त्यांच्या प्रजननावरही झाला. परिणामी, त्यांची संख्या झपाट्याने घटू लागली व ते नष्ट होऊन गेले. याबाबतच्या संशोधनाची माहिती अर्थ हिस्टरी अँड बायोडायव्हर्सिटी या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. वुली मॅमथ हे प्राणी २० लाख वर्षांपूर्वीपासून ते ११,७०० वर्षांपूर्वीपर्यंत अस्तित्वात होते, असे मानले जाते. दहा हजार वर्षांपूर्वी त्यांच्या बहुतांश अधिवासामधून ते नष्ट झाले. मात्र, चार हजार वर्षांपूर्वीपर्यंत त्यांची छोटीशी संख्या ईशान्य रशियातील रंगल आयलंड या दुर्गम बेटावर अस्तित्वात होती.

## जीवनसत्वांची कमतरता आणि झोप

**तुम्हाला माहीत आहे का की, काही विशिष्ट जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळेही झोपेच्या समस्या निर्माण होऊ शकतात? यामध्ये विशेषतः, जीवनसत्त्व बी आणि डी यांचा अभाव असणे खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. चला तर मग जाणून घेऊया, कोणती जीवनसत्त्वे झोपेच्या समस्येशी संबंधित आहेत आणि कोणते अन्नपदार्थ ती समस्या टाळण्यासाठी मदत करू शकतात.**





### जीवनसत्त्व बी-६

हे आपल्या शरीरात मेलाटोनिन नावाच्या हार्मोनचे उत्पादन करण्यासाठी आवश्यक असते, ज्यामुळे झोपेचे नियमन होते. या जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास मेलाटोनिनचे उत्पादन कमी होते, ज्यामुळे झोप येण्यात अडथळे येतात. जीवनसत्त्व बी-६ च्या कमतरतेमुळे निद्रानाश किंवा अपुरी झोप होऊ शकते. ही समस्या टाळण्यासाठी आहारात जीवनसत्त्व बी-६ असलेले अन्न पदार्थ समाविष्ट करणे महत्त्वाचे आहे. केळी, पालक, गाजर, सफरचंद, आणि सोयाबीन हे जीवनसत्त्व बी-६ ने समृद्ध अन्नपदार्थ आहेत, ज्यामुळे झोप सुधारली जाऊ शकते.

### जीवनसत्त्व डी

या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे शरीरातील सेरोटोनिनची पातळी कमी होते, ज्यामुळे मूड स्विंग्स होतात आणि झोपेवर परिणाम होतो. घरात किंवा कार्यालयात जास्त वेळ घालवल्याने सूर्यप्रकाश कमी मिळतो, ज्यामुळे जीवनसत्त्व डीची कमतरता होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे निद्रानाश आणि थकवा येऊ शकतो. अंडी, मशरूम, दही, मासे (विशेषतः सॅल्मन) आणि सूर्यप्रकाश हे जीवनसत्त्व डी मिळवण्यासाठी उत्तम स्रोत आहेत.




### जीवनसत्त्व बी-१२

या जीवनसत्त्वामुळे आपल्या शरीरातील लाल रक्तपेशींचे उत्पादन सुधारते, ज्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि थकवा कमी होतो. याची कमतरता असल्यास सतत थकवा येतो आणि झोपेच्या वेळापत्रकात अडथळे येतात. जीवनसत्त्व बी-१२ च्या अभावामुळे झोपेची चक्रे असमान होऊ शकतात आणि जागरणाची समस्या निर्माण होऊ शकते. दूध, चीज, मासे, अंडी, आणि चिकन हे जीवनसत्त्व बी-१२ चे चांगले स्रोत आहेत, ज्यामुळे शरीरातील थकवा कमी होतो आणि झोप सुधारते.




### मॅग्नेशियम

हे मिनरल म्हणजेच खनिज झोपेचे चक्र संतुलित ठेवण्यासाठी आवश्यक असते. त्याचे प्रमाण कमी झाल्यास झोपेची वेळ आणि गुणवत्ता दोन्ही प्रभावित होऊ शकतात. मॅग्नेशियमची कमतरता असल्यास शरीराला पुरेशी विश्रांती मिळत नाही आणि स्लीप सायकल तुटते. बदाम, काजू, पालक आणि काळे चणे हे मॅग्नेशियमने समृद्ध अन्नपदार्थ आहेत. यांचा आहारात समावेश केल्याने झोपेची गुणवत्ता सुधारू शकते.





### जीवनसत्त्व ई




हे एक उत्कृष्ट अँटिऑक्सिडंट आहे, जे आपल्या शरीरातील पेशींना संरक्षण देते. याची कमतरता असल्यास शरीरातील ऑक्सिडेटिव्ह तणाव वाढतो, ज्यामुळे थकवा आणि झोपेच्या समस्यांचा सामना करावा लागतो. योग्य प्रमाणात जीवनसत्त्व ई घेतल्याने शरीर शांत होते आणि झोपेचा दर्जा सुधारतो. बदाम, सूर्यफुलाचे बी, आणि भोपळ्याचे बी हे जीवनसत्त्व ई च्या चांगल्या स्रोतांपैकी आहेत, ज्यामुळे झोपेची समस्या कमी होऊ शकते. योग्य आहार आणि जीवनसत्त्वांचे पुरेसे प्रमाण घेतल्यास झोपेची गुणवत्ता सुधारू शकते आणि झोपेची समस्या दूर होऊ शकते.

## एटीएमला आता फेस डिटेक्शन

बँक खात्यातील पैसे काढण्यासाठी एटीएम मशिनचा वापर आता सर्वसामान्य बनलेला आहे. जगात पाण्यापासून सोन्यापर्यंत अनेक वस्तू मिळवण्याचेही असे मशिन्स आहेत. मात्र, बँकेच्या व्यवहारासाठी मनुष्याची ओळख पटवणे हे गरजेचे असते. चीनच्या संशोधकांनी प्रथमच चेहरा पाहून माणसाची ओळख पटवणारे एटीएम यंत्र तयार केले आहे. त्यामुळे एटीएम यंत्रांवर दरोडे पडण्याची जोखीम कमी होईल. तिंगशुआ विद्यापीठ व हांगझाऊची झेकवान टेक्नॉलॉजी कंपनी यांनी हे यंत्र तयार केले आहे. त्यात आर्थिक व्यवहारांना संरक्षण मिळाले आहे असे साऊथ चायना मॉर्निंग पोस्ट या वृत्तपत्राने म्हटले आहे.




झेकवानचे अध्यक्ष ग्यू झिकून यांनी सांगितले की, या नव्या एटीएममुळे आर्थिक गुन्हे कमी होतील. चीनमध्ये सध्या आयात केलेले एटीएम तंत्रज्ञान वापरले जाते; पण नवीन यंत्रे नोटा अधिक वेगाने हाताळू शकतात, खोट्या नोटा ओळखू शकतात व पैसे काढायला आलेल्याचा चेहरा ओळखू शकतात. हे तंत्रज्ञान संपूर्ण चिनी आहे. ग्यू यांच्या या उत्पादनास अधिकाऱ्यांनी प्रमाणित केले आहे. चिली व कोलंबिया या देशांमध्ये बोटांचे ठसे ओळखणारी एटीएम यंत्रे आहेत. काही देशात बायोमेट्रिक यंत्रे वापरली जात नाहीत. त्यात अमेरिकेचा समावेश आहे, कारण त्यात व्यक्तिगतता राहत नाही.

चीनची नवीन एटीएम यंत्रे देशातील बँकांना व सुरक्षा यंत्रणांना जोडली जाऊ शकतील. त्यामुळे ज्याच्याकडे डेबिट कार्ड असेल, तोच पैसे काढू शकेल. जरी दुसऱ्याला पासवर्ड माहिती असला तरी त्याला पैसे काढता येणार नाहीत. या तंत्रज्ञानाच्या विरोधकांनी व्यक्तिगततेचा मुद्दा उपस्थित केला असून, ऑनलाईन अचूकतेवर शंका घेतल्या आहेत. जर कुणाची प्लास्टिक सर्जरी झाली असेल तर चेहरा कसा ओळखणार? कारण, एखादी व्यक्ती तिचा चेहरा अलिबाबाचे संस्थापक जॅक मा यांच्यासारखाही करू शकतो. अर्थात, चिन्यांच्या अजब देशात काहीही घडू शकत असल्याने अशा शंका रास्तच आहेत.

## अन्न न शिजवणारे गाव



आपल्या देशात अनेक अनोखी गावं आहेत. संस्कृत बोलणारे गाव, जुळ्यांचे गाव, श्रीमंत गाव, घराला दारे नसणारे गाव अशी ओळख असणारी ही काही गावं आहेत. गुजरातमध्येही असेच एक गाव आहे. या गावातील घरात स्वयंपाकघर नाही. याचा अर्थ या गावातील घरांमध्ये अन्न शिजवले जात नाही. आता घरात अन्न शिजवले जात नाही, याचा अर्थ असा नव्हे की गावातील लोक उपाशीच असतात! या गावात सर्वांसाठी एकत्रच अन्न शिजवले जाते व सर्व गावकरी नाश्ता व दोन्ही वेळेचे जेवण एकत्रच घेतात! या गावाचे नाव आहे चंदनकी. गुजरातच्या मेहसाणा जिल्ह्यात हे छोटेसे गाव आहे.

### एकाकीपणा दूर व्हावा यासाठी एका जागी एकत्र बसून जेवतात

या गावात पक्के रस्ते आहेत आणि चोवीस तास वीजही असते. या ठिकाणी इतकी स्वच्छता असते की डास, माशा शोधूनही सापडणार नाहीत! प्रत्येक घरात शौचालय आहे. गावाची लोकसंख्या १३०० आहे. त्यापैकी ९०० लोक नोकरी- व्यवसायाच्या निमित्ताने अहमदाबाद किंवा अगदी अमेरिकेतही गेलेले आहेत. त्यामुळे गावात केवळ वयस्कर लोकच बहुतांश संख्येने आहेत. या वृद्ध लोकांचा एकाकीपणा दूर व्हावा, तसेच त्यांचे काम हलके व्हावे यासाठी गावात एक अनोखी योजना अंमलात आणली गेली. या योजनेनुसार गावातील कुणीही आपल्या घरात जेवण बनवायचे नाही. सकाळचा नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण एकाच मोठ्या स्वयंपाकघरात शिजवले जाते. हे अन्न गावातील शंभरभर वृद्ध लोक एका जागी एकत्र बसून आनंदाने खातात. एखाद्या घरात पाहुणे मंडळी आली तरी त्यांच्या नाश्ता व जेवणाची सोयही या ठिकाणीच होते. जेवण्याच्या वेळी सर्वात आधी महिला जेवतात मग पुरुष. अगदी सणावारीही असेच सामुदायिक जेवण होते. गावातील लोकांसाठी आरोग्यवर्धक व स्वादिष्ट जेवण एका सामुदायिक भोजनकक्षात बनवले जाते. या गावाला स्वच्छ गाव, तीर्थ गाव असे काही पुरस्कारही मिळालेले आहेत. गावातील एकी, नीटनेटके नियोजन, स्वच्छता यांचे नेहमी कौतुक होत असते.

## चक्क टचस्क्रीन कापड!



सध्याचा जमाना 'वेअरेबल गॅझेटस'चा म्हणजेच शरीरावर परिधान करता येऊ शकणाऱ्या आधुनिक उपकरणांचा आहे. 'गुगल' या तंत्रज्ञान कंपनीने स्पर्श पडद्यासारखे म्हणजेच टचस्क्रीन असलेले कपडेही बनवण्याचा प्रोजेक्ट सुरू केला होता, हे तुम्हाला माहिती आहे का? हे कपडे वाहकतेचा गुणधर्म असलेल्या धाग्यांपासून बनवण्यात येतात.

या प्रकल्पाचे नाव 'जॅकार्ड' असे असून, गुगलच्या ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी अँड टेक्नॉलॉजी प्रयोगशाळेत याबाबतचे प्रयोग झाले. त्यामध्ये स्मार्ट धागे वापरण्यात आले आहेत. ते स्पर्श संवेदनशील असतील व नेहमीच्या धाग्यांबरोबर विणले जातील. स्पर्शपडद्यात वापरले जाणारे धागे बारीक, धातूच्या संमिश्रापासून बनवलेले असतात. ते कापसाच्या व रेशमी धाग्यांबरोबर वापरता येते. जॅकार्ड धागे असे वापरले जातात, ज्यात ते वापरणाऱ्याला कुठे वापरले आहेत हे दुप्पट जाडीवरून समजते; पण एरवी ते बाहेरून कळत नाही. वहनक्षमता असलेल्या धाग्यांचा वापर यात केला जातो. या कपड्यांना स्पर्श कळतो किंवा हातांच्या इशाऱ्यांवरून कृतीचा संदेश मिळतो. या कपड्यात मोठ्या पृष्ठभागात ते धागे विणले जातात. त्यामुळे आंतरक्रियात्मक पृष्ठभाग मोठा असतो. यातील सर्किट्स हे जॅकेटच्या बटनपेक्षा मोठे असणार नाहीत, वहनक्षमता असलेले धागे जोडून ते तयार केले जातील. इलेक्ट्रॉनिक्सचा हा सूक्ष्म अवतार येथे वापरला जाणार आहे. स्पर्शाच्या माध्यमातून तुम्हाला या कपड्यातून इलेक्ट्रॉनिक उपकरणांना संदेश देता येऊ शकतो. यंत्राला समजू शकणाऱ्या अलगॉरिथमचा वापर यात केला जातो. स्पर्श व हातवाऱ्यांतून मिळणारी माहिती बिनतारी पद्धतीने मोबाईल फोनकडे वाहून नेली जाते. इतर अनेक उपकरणेही त्यावर चालवता येतात. त्यातून ऑनलाईन सेवा, ॲप्स चालवता येतात. गुगलने या धाग्यांचे प्रात्यक्षिक दाखवले असून, त्यात फिलिप्सचे रंगीत दिवे स्पर्शाच्या माध्यमातून नियंत्रित करण्यात येतात. या कपड्यावर टिचकी मारली तर दिवे चालू होतात किंवा बंद होतात व विविध रंगांचे दिवे लावण्याचा क्रमही त्यात आणता येतो, त्याची प्रकाशमानता कमी-जास्त करता येते.

## तुवालूची समुद्रसमाधी

प्रशांत महासागरात नऊ लहान बेटांवर तुवालू हा देश वसलेला आहे; पण तो सध्या आपल्या अस्तित्वाच्या संकटाला तोंड देत आहे. या बेटावर राहत असलेल्या लोकांची संख्या ११ हजार इतकी आहे. या देशाच्या जनतेच्या हातातून सध्या वेळ वेगाने निसटत चालली आहे. याचे कारण तुवालूची समुद्रसपाटीपासूनची उंची फक्त २ मीटर (६.५६ फूट) आहे. गेल्या तीन दशकांत होत असलेली तापमान वाढ आणि हवामान बदल यामुळे समुद्राची पातळी १५ सेमी (५.९१ इंच) वाढली आहे. समुद्राच्या पातळीत सुमारे सहा इंच वाढ झाली आहे. जी जागतिक सरासरीच्या दीडपट आहे. समुद्राच्या नियमित भरतीमुळे २०५० पर्यंत हे सर्वात मोठे बेट अर्धे पाण्याखाली जाईल, असा अंदाज 'नासा'ने व्यक्त केला आहे.

या बेटावर तुवालुचे ६० टक्के लोक राहत आहेत. येथील रहिवासी फुकानोई लाफई यांनी सांगितले की, ते कुटुंब वाढवण्याची योजना आखत आहेत. परंतु, त्यांची मुले मोठी होईपर्यंत बेट हे समुद्रात बुडून जाईल, अशी त्यांना भीती वाटत आहे. या भीतीमुळे लोकं मूलं जन्माला घालण्याच्या विचारात नाहीयेत. कारण, त्यांना भविष्याची चिंता वाटतेय. लोकसंख्या वाढली तर त्यांना त्यांची जागा सोडून विस्थापित व्हावे लागेल. तुवालूमध्ये धोक्याचा इशारा देण्यात आला आहे. कारण, समुद्राची पातळी वाढल्याने भूजलात पाणी शिरत आहे. पिके नष्ट होऊ लागली आहेत. रहिवाशांना पावसाच्या पाण्याच्या टाक्या आणि केंद्रिकृत शेतातून भाजीपाला पिकवावा लागत आहे.



तुवालूला १९७८ मध्ये ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाले होते. त्याचे एकूण क्षेत्रफळ २६ चौरस कि.मी. आहे. पूर्वी ते 'एलिस बेट' म्हणूनही ओळखले जात असे. ऑस्ट्रेलिया दरम्यान ते पॅसिफिक म्हणजेच प्रशांत महासागरात स्थित आहे. व्हॅटिकन सिटीनंतर हा जगातील सर्वात कमी लोकसंख्या असलेला देश आहे. २०२१ च्या आकडेवारीनुसार येथील लोकसंख्या ११,९०० इतकी आहे. हवामान आणि लोकांची सुरक्षा लक्षात घेता, २०२३ मध्ये तुवालू आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात एक करार झाला आहे. याअंतर्गत २०२५ पासून दरवर्षी २८० लोकांना ऑस्ट्रेलियात कायमचे विस्थापित केले जाणार आहे. जेणेकरून हा भाग पाण्याखाली जाण्यापूर्वी त्यांना देश सोडून जाता येईल. येथील नागरिकांना आपल्या पूर्वजांची जमीन सोडायची नसली तरी सध्या त्यांच्याकडे दुसरा पर्याय नाही. येथील सरकार आणखी एका संकटाचा सामना करत आहे. त्यांची इच्छा आहे की, तुवालू जरी बुडाले तरी संयुक्त राष्ट्रांनी त्यांना स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून कायदेशीर मान्यता द्यावी. तुवालूला आपल्या सागरी क्षेत्रावर नियंत्रण ठेवायचे आहे. कारण, हे संपूर्ण क्षेत्र 'आर्थिक क्षेत्र' म्हणून सुमारे नऊ लाख चौरस कि.मी. आहे. मासेमारीच्या अधिकारांसह सर्व सागरी क्रियाकलापांसाठी हे एक मोठे क्षेत्र आहे.

# शहरातील आरोही संगीत विद्यालयाचे यश




नगर - अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने (केंद्र क्रमांक ९९) नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२४ या सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षेत तबला आणि गायन या विषयात आरोही संगीत विद्यालयाचे विद्यार्थी प्रथम तसेच विशेष योग्यता श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आणि १०० % निकालाची परंपरा कायम ठेवली.

परीक्षा निहाय निकाल पुढील प्रमाणे : मुकेश गुप्ता हा विद्यार्थी प्रारंभिक परीक्षेत केंद्रात प्रथम तर वरद शिंदे आणि शौर्य देशमुख हे विद्यार्थी प्रवेशिका प्रथम परीक्षेत केंद्रात प्रथम आले आहेत

प्रारंभिक (तबला) १) मुकेश गुप्ता :-विशेष योग्यता (केंद्रात प्रथम) , २) कृष्णा खराडे :-विशेष योग्यता, ३) राजवीर भोसले :-विशेष योग्यता, ४) गावडे कौस्तुभ :-विशेष योग्यता, ५) संकेत अडसूरे :-विशेष योग्यता, ६) रोहन महाडीक :-विशेष योग्यता, ७) हर्षद कोळशे :-विशेष योग्यता, ८) अनिशा सोनवणे :-विशेष योग्यता, ९) ओंकार सायकर :-विशेष योग्यता, १०) आदित्य रूपनर :-विशेष योग्यता, ११) सूरज खंडागळे :-विशेष योग्यता, १२) श्रावणी थोरवे :-विशेष योग्यता.

प्रवेशिका प्रथम (तबला) १) वरद शिंदे:-विशेष योग्यता (केंद्रात प्रथम), २) शौर्य देशमुख :-विशेष योग्यता (केंद्रात प्रथम), ३) साईराज खाडे:-प्रथम श्रेणी, ४) सर्वेश इथापे :-प्रथम श्रेणी, ५) पवन चांदणे :-प्रथम श्रेणी, ६) कार्तिक शेवाळे :-प्रथम श्रेणी, ७) सुमित जावळे:-प्रथम श्रेणी.

प्रवेशिका पूर्ण (तबला) १) वंश डोंगरे:-प्रथम श्रेणी., प्रवेशिका पूर्ण (गायन) १) मधुरा शीतोळे-विशेष योग्यता.

प्रवेशिका प्रथम(गायन) १) श्लोक गायकवाड-विशेष योग्यता, २) संदीप मांढरे - प्रथम, ३) स्वरुपा होले- प्रथम.

प्रारंभिक(गायन) १) आरोही डोंगरे-विशेष योग्यता, २) कविता गायकवाड -प्रथम, ३) स्वराली पंडित-प्रथम, ४) श्रील काटे- प्रथम, ५) अनिल बेल्हेकर - प्रथम, ६) स्वरा कुलकर्णी प्रथम.

विद्यार्थ्यांना आरोही संगीत विद्यालयाचे अध्यक्ष : स्वप्निल खराडे सर (तबला विशारद), आदेश चव्हाण सर (MA म्यूझिक) तसेच संचालिका शितल खराडे (BA म्यूझिक) यांचे मार्गदर्शन लाभले.

# अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेकडून प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी

## परवडणाऱ्या किंमतीत सर्वांसाठी घरकुले उभारणार, भाडे तत्वावरही घरकुले उपलब्ध करणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर - शहरात शासननिणर्यानुसार प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) २.० राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत चार घटकांचा समावेश असून नागरिकांना परवडणाऱ्या किंमतीत घरकुले उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. स्वतःच्या जागेत घर बांधण्यासाठीही अनुदान उपलब्ध होणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे सोबत घेवून महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागात संपर्क साधून अर्ज करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व्यक्तीगत स्वरुपात घरकुल बांधण्यास अनुदान, भागीदारी तत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती, भाडेतत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती, व्याज अनुदान योजना अशा चार घटकांतर्गत प्रकल्प राबवण्यात येणार आहे. अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना अर्ज भरण्याकरता प्रकल्प विभाग, शहरस्तरीय तांत्रिक कक्ष, (CLTC) प्रधानमंत्री आवास योजना, नविन प्रशासकिय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर महानगरपालिका येथे सुविधा उपलब्ध आहे. संबंधित घटकातील योजनेचे युनिफाईड वेब पोर्टलवरील लाभार्थी यांनी स्वतः उपस्थित राहून फॉर्म, भरून मनपात नोंदणी करणे आवश्यक आहे, असे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

योजनेत पात्र होण्यासाठी निकष पुढील प्रमाणे - १. लाभार्थी कुटूंबामध्ये पती-पत्नी व अविवाहित (वय वर्ष १८ वरील) मुले/मुली यांचा समावेश असेल. २. या योजने अंतर्गत अनुदान/सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरिता शहरी भागात राहणाऱ्या EWS/LIG/MIG कुटूंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर नसावे. ३. लाभार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. ४. योजने अंतर्गत बांधण्यात येणारी घरे कुटूंबातील कर्त्या महिलेच्या किवा कर्त्या पुरुष व महिला यांचे संयुक्त नावावर असतील. ५. आर्थिक दुर्बल घटकांसाठी ३ लक्ष इतकी कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा राहील. (अर्जदाराचा चालू वर्षाचा तहसिलदार यांचे उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक आहे.) ६. स्वतःच्या नावाने व कुटूंबातील आधारकार्ड लिंक असलेले बँक खाते (बँक पासबुक) असावे. ७. जात प्रमाणपत्र (SC, ST किंवा OBC) लाभार्थीसाठी आवश्यक आहे.

# मंगलगेट येथील गावठी दारू अड्ड्यावर छापा; गुन्हा दाखल

नगर - बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टीची दारू विक्री सुरु असणाऱ्या मंगलगेट परिसरातील कोंड्यामामा चौक येथील दारू अड्ड्यावर तोफखाना पोलिसांनी छापा टाकत २१०० रुपये किमतीची दारू जप्त केली.

या प्रकरणी नितीन राजन्ना भिंगारे (वय ५०, रा. कोंड्यामामा चौक मंगलगेट) याच्या विरुद्ध पो. कॉ. दत्तात्रय कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ ई प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# आडसूळ तंत्रनिकेतनच्या परीक्षांचा निकाल जाहीर

## प्रतीक्षा चोरमागे ७० पैकी ७० गुण, ९२.३३% दिव्या रमनानी प्रथम तर ९१.६०% गायकवाड केशव द्वितीय

नगर - चास येथील सौ. सुंदरबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निक महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने घेतलेल्या हिवाळी २०२४ परीक्षांचा निकाल जाहीर झाला.

कम्प्युटर इंजिनिअरिंग मधून तृतीय वर्षातून प्रथम क्रमांकाने दिव्या रमनानी ९२.३३%, द्वितीय क्रमांकाने तन्मय गावखरे ९०.५६%, आणि तृतीय क्रमांकाने प्रतीक चन्ना ८८.५६% मिळून उत्तीर्ण झाले. तर द्वितीय वर्षातून प्रथम क्रमांकाने तेजस्वी दांगडे ८६.८९%, द्वितीय क्रमांकाने श्वेता भागवत ८५.२९%, आणि तृतीय क्रमांकाने मानसी खळदकर ८४.५८% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. तर प्रथम वर्षातून प्रगती येणारे ८०.४७%, द्वितीय क्रमांकाने उत्कर्षा देवकर ८०.२४% आणि तृतीय क्रमांकाने काजल सैनी ७७.४७% गुण मिळवत उत्तीर्ण झाले.

सिव्हिल इंजिनिअरिंग मधून तृतीय वर्षातून प्रथम क्रमांकाने केशव गायकवाड ९१.६०%, द्वितीय क्रमांक चोरमागे प्रतीक्षा ९०.२०% तसेच तृतीय क्रमांकाने ठाकरे निर्मल ८८% मिळवत उत्तीर्ण झाले. द्वितीय वर्षातून प्रथम क्रमांकाने श्रावणी कोमाकुल ८०.९४%, द्वितीय क्रमांकाने साईराज कार्ले ७३.५३%, तृतीय क्रमांकाने आदित्य शेळके ६८.१२ % मिळवत उत्तीर्ण झाले. प्रथम वर्षातून प्रथम क्रमांकाने उरमुडे गौतमी ८१.६५%, द्वितीय क्रमांक दारूवाला उम्मीजोया ८०.७१%, तृतीय क्रमांक अनिकेत दारकुंडे ७७.०६% गुण मिळवत उत्तीर्ण झाले.

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातून तृतीय वर्षातून प्रथम क्रमांकाने आनंदकर सार्थक ८२.८४%, द्वितीय क्रमांकाने सुरज दारकुंडे ८२.७४% तसेच तृतीय क्रमांकाने अब्बास नगरवाला ८०.२४% मिळवत उत्तीर्ण झाले. द्वितीय वर्षातून प्रथम क्रमांकाने कोमल जिने ७६.५६%, द्वितीय क्रमांकाने आदित्य क्षीरसागर ७५% तसेच तृतीय क्रमांकाने अनुष्का दुधाडे ७१.२२% गुण मिळवत उत्तीर्ण झाले. प्रथम वर्षातून प्रथम क्रमांकाने क्षीरसागर संस्कृती ७९.२९%, द्वितीय क्रमांकाने मंजुश्री मोरे ७८.९४% तसेच तृतीय क्रमांकाने गांगुर्डे आकांक्षा ७७.२९% मिळवत उत्तीर्ण झाले.

इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागामधून तृतीय वर्षातून प्रथम क्रमांकाने अनिकेत पानसांबळ ८२.१०%, द्वितीय क्रमांकाने कोमल ससाने ८१.३%, तृतीय क्रमांकाने वर्ष पगारे वर्षा ७७.८% गुण मिळवत उत्तीर्ण झाले. द्वितीय वर्षातून प्रथम क्रमांकाने दिनेश पाडळे ७८.९४%, द्वितीय क्रमांकाने महेश दराडे ७६.८२%, तृतीय क्रमांकाने अनिकेत गावडे ६६.२४% गुण मिळवत उत्तीर्ण झाले. तसेच प्रथम वर्षा मधून प्रथम क्रमांक मिळवत सार्थक गवारे ७२.८२%, द्वितीय क्रमांकाने वेदांत कानडे ७२.२२% तसेच तृतीय क्रमांकाने साक्षी पाचारणे व अमर अकोलकर ७० टक्के मिळवत उत्तीर्ण झाले.

मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून तृतीय वर्षातून प्रथम क्रमांकाने हेमंत धाराशिवकर ७७.०५%, द्वितीय क्रमांकाने ऋतिक रनावरे ७५.२४%, तृतीय क्रमांकाने सौरभ लांडे ७५.१४% मिळवत उत्तीर्ण झाले. द्वितीय वर्ष मधून प्रथम क्रमांकाने सार्थक उकांडे ६९.७८%, द्वितीय क्रमांकाने नवाजिश सय्यद ६९.६७% तसेच तृतीय क्रमांकाने अंकुश शर्मा ६७.४४% मिळवत उत्तीर्ण झाले. प्रथम वर्षा मधून प्रथम क्रमांकाने मंगेश सुपेकर ७५.१८%, द्वितीय क्रमांकाने प्रज्वल कोतकर ७३.२९% व तृतीय क्रमांकाने प्रतीक जाधव ७१.६५% गुणांसह उत्तीर्ण झाले.

संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध माणिक आडसूळ, सचिव सौ. लीनाताई आडसुळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, संचालक कृष्ण आडसूळ, डिग्री प्राचार्य व डायरेक्टर डॉ. प्रदीप एम पाटील, डायरेक्टर डॉ. संभाजी पठारे, प्राचार्य रमेश एस गडाख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या यशामध्ये प्रथम वर्ष विभाग प्रमुख प्रा. जगधने एम. के, इलेक्ट्रिकल विभाग प्रमुख प्रा. पवळे एस. एस, मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा. जाधव एम. बी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभाग प्रमुख प्रा. पाळंदे एस. सी, कम्प्युटर विभाग प्रमुख प्रा. होले पी.पी, सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. म्हस्के ए. ए, तसेच सर्व शिक्षकांचा सिंहाचा वाटा असल्याचे प्राचार्य रमेश एस गडाख यांनी संवाद साधताना सांगितले.



राजपूत समाज सेवा समितीच्या वतीने हळदी कुंकू कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ महिलांच्या हस्ते करण्यात आले.

# राजपूत समाज सेवा समितीतर्फे हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात

नगर - राजपूत समाज सेवा समितीतर्फे नगर शहरातील समाज बांधवांना करता तिळगुळ व हळदी कुंकू कार्यक्रम सीताबन लॉन्स येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये डान्स स्पर्धा, तसेच महिलांकरता विविध प्रकारचे गेम्स व कपल गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात समाजातील ज्येष्ठ महिलांच्या हस्ते वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी नगर शहरातील सर्व राजपूत समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी समाजाने मागील वर्षात केलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली व पुढील वर्षात घेणाऱ्या उपक्रमांची ही माहिती देण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या विविध प्रकारच्या

गेम्समध्ये सर्व महिला, मुलांनी सहभाग नोंदवला. त्यांतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

# लाडके भाऊ, बहिणी सक्षम व कुशल करणार



विनय वाखुरे

नगर - भारत सरकार पुरस्कृत नवी दिल्ली येथील कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयामार्फत अहिल्यानगर येथील जन शिक्षण संस्थान द्वारे लाडके भाऊ व बहिणी आता सक्षम व कुशल होणार त्यासाठी संस्थेद्वारे विविध कोर्सेस सुरू करणार असल्याची माहिती विनायक राज प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विनय वाखुरे यांनी दिली.

अहिल्यानगर येथील सावेडीमध्ये या कोर्सचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामध्ये चार कोर्सेस आहेत. असिस्टंट ड्रेस मेकर, हात भरतकाम, ब्युटी केअर असिस्टंट, असिस्टंट फ्रुट अँड व्हेजिटेबल प्रक्रिया व जतन यांचा समावेश आहे. कोर्सेसचा कालावधी १०५ दिवसांचा असून त्यासाठी ८० सेशन असल्याचे श्री.वाखुरे यांनी सांगितले.

माहिती व नाव नोंदणीसाठी ८२३७३७७००७ यांच्याशी संपर्क साधावा. या कोर्सेसची वैशिष्ट्ये अशी की एका कोर्ससाठी किमान २५ प्रशिक्षणार्थींचा विनंतीवरून प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर एनसीव्हिटी भारत सरकारचे बारकोड प्रमाणपत्र मिळेल. आधार बेस व बायोमेट्रिक हजेरी, नामपात्र शुल्क असून वयोमर्यादा १५ ते २५ वर्षे आहे. कौशल्य प्रमाणपत्रामुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल उभारणीत सबसिडी कर्ज योजनेचा लाभ घेता येईल. नोकरी किंवा लघु उद्योगाचे मालक होण्यासाठी उपयुक्त प्रमाण मिळणार असल्याने नगर मधील लाडके भाऊ व बहिणींनी याचा लाभ घ्यावा. असे आवाहन प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

# सर्जेपुरा येथील बाबुराव इंगळे चौक सबलोक रिक्षा स्टॉपचा शुभारंभ

नगर - अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने सर्जेपूरा येथील बाबुराव इंगळे चौक सबलोक रिक्षा स्टॉपचा शुभारंभ संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले व विकी इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष दत्ता वामन, कार्याध्यक्ष विलास कराळे, सरचिटणीस अशोक औशीकर, खजिनदार गणेश आटोळे, संघटक सुधाकर साळवे, नासिर खान, विकास उडानशिवे, शाखा अध्यक्ष विकास धाडगे, उपाध्यक्ष बाळू खुडे, नितीन पवार, खजिनदार विकी चव्हाण, संतोष भोसले, संदीप वैरागर, सागर खुडे, मनोहर चखाले, राजू कांबळे, जफर काझी, अज्जू पठाण, समीर सय्यद, सोमनाथ सकट, सतीश लोंढे, लखन लोखंडे, मोजेस साळवे, पवन शेरकर, राम खुडे, बोरुडे, सचिन कनगरे आदींसह रिक्षा चालक उपस्थित होते.



अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटनेच्यावतीने सर्जेपूरा येथील बाबुराव इंगळे चौक सबलोक रिक्षा स्टॉपचा शुभारंभ संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले व विकी इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले.

अविनाश घुले म्हणाले, संघटनेला रिक्षा चालक जोडले जात असताना त्यांचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी देखील वाढत आहे. रिक्षा चालकांना संघटित करुन त्यांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य संघटनेच्या माध्यमातून केले जात आहे. आरटीओ कार्यालय, शहर वाहतुक शाखेशी निगडीत प्रश्न सोडविण्यासाठी संघटना रिक्षाचालकांच्या पाठिशी उभी असल्याचे त्यांनी सांगितले.

विकी इंगळे म्हणाले की, बेरोजगार युवक रिक्षाचा व्यवसाय करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहे. मोठ्या प्रमाणात रिक्षा चालक नागरिकांना सेवा देण्याचे काम करत असून, त्यांचे शासनस्तरावरील प्रश्न संघटितपणे केलेल्या पाठपुराव्याने सुटणार आहे. तर रिक्षा चालकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी नेहमीच सहकार्य राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



ज्ञानसंपदा शाळेत माजी विद्यार्थी संघाचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी संपदा विद्या प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी, संस्थेचे खजिनदार अविनाश बोपर्डीकर, मुख्याध्यपिका सौ. शिवांजली अकोलकर आदी उपस्थित होते.

# ज्ञानसंपदा शाळेत माजी विद्यार्थी संघ मेळावा

नगर - ज्ञानसंपदा शाळेत माजी विद्यार्थी संघाचा पहिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मागचा मूळ उद्देश म्हणजे, माजी विदयार्थ्यांचा शाळेशी स्नेहभाव वृद्धिंगत होण्यासाठी सतत शाळेशी संपर्कात राहून शाळा व आत्ताच्या विदयार्थ्यांसाठी आपले योगदान द्यावे. शाळेच्या नवनवीन उपक्रमात आपल्या उच्च शिक्षण, व्यवसाय, नोकरीचा अनुभव सांगून मुलांना मार्गदर्शन करावे. वेगवेगळ्या प्रकारचे करिअर मार्गदर्शन सत्र आयोजित करावे, या मुख्य उद्देशाने याचे आयोजन करण्यात आले होते.

२०१३-१४ ते २०२३-२४, या १० वर्षातील बॅचच्या अनेक विदयार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली. या माजी विदयार्थी संघाची एक कोअर कमिटी तयार करण्यात आली जेणेकरून वर्षभर विविध उपक्रम राबविता येतील. यात संस्थेचे खजिनदार अविनाश बोपर्डीकर, मुख्याध्यपिका सौ. शिवांजली अकोलकर, सहशिक्षक कैलास जाधव व विदयार्थी प्रतिनिधी महेश नेमाने, संकेत आंबेडकर, संगीत ठाकूर, शुभम मडके यांचा समावेश केला गेला.

संपदा विद्या प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी यांनी माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील कामगिरीबद्दल तसेच शाळेशी ठेवलेल्या ऋणानुबंध व सहकाऱ्याबद्दल कौतुक करत अभिनंदन केले. सूत्रसंचालन ऐश्वर्या उमाप, माहेश्वरी निघुटे व नीलिमा क्षीरसागर यांनी केले.

## दुचाकीची चोरी

नगर - शहरातील खिस्त गल्ली येथील चर्च रोडवरील पटवा रॉकेल दुकानासमोर, रस्त्याच्या कडेला लावलेली हिरो कंपनीची एच.एफ.डीलक्स मोटरसायकल (क्र. एम एच १६ सी एल ३४११) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी राजेश उर्फ राजेंद्र रामचंद्र नगरकर (वय ६०, रा. जुना बाजार, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## मोटारसायकलची चोरी

नगर - मंदिरासमोर लावलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्र.एम एच १६ ई ७१४८) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना भिंगार येथील रोकडेश्वर मंदिरासमोर घडली. याप्रकरणी वसंत किसन भिंगारदिवे (वय ५८ रा. आगडगाव रोड, भिंगारदिवे मळा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



बुऱ्हाणनगर येथे महिला गृहउद्योगाचे उद्घाटन सौ.प्रियंका कर्डिले यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचालिका गितांजली फासे व चित्रा शिंदे आदी.

# बुऱ्हाणनगर येथे महिला गृहउद्योगाचे उद्घाटन

नगर - महिलांना संघटीत करून त्यांना रोजगार देण्याच्या उद्देशाने बुऱ्हाणनगरच्या दोन होतकरू सुशिक्षित महिला गितांजली फासे व चित्रा शिंदे यांनी गुरुकृपा व प्रगती महिला गृहउद्योगाच्या माध्यमातुन शहरी भागातील महिला भगिनींची गरज ओळखून वर्षभरासाठी लागणारे मसाले, मसाल्याचे पदार्थ यामध्ये हळद, लाल तिखट, काळा मसाला, मालवणी मसाला, मिसळ मसाला, पावभाजी मसाला, गावरान तडका अशाप्रकारचे मसाले त्याचसोबत वेगवेगळ्या प्रकारच्या चटण्या त्यामध्ये शहरात आवडीने खाल्लया जाणाऱ्या चटण्या शेंगदाणे चटणी, तीळ चटणी, जवस, खोबरे, लसुन याचसोबत चपाती, पुरी, खाकरा यासोबत खाता येणारी शेंगदाणे चटणी व चटण्यांचे अनेक प्रकार बनवण्याचा मानस संचालिका गितांजली फासे व चिमाजी शिंदे यांनी बोलून दाखवला.

कार्यक्रमासाठी सौ. प्रियंका कर्डिले, बुऱ्हाणनगर ग्रामपंचायतचे सरपंच रावसाहेब कर्डिले, ग्रामसेवक शेळके भाऊसाहेब, अनिता भोजने, वैशाली भोजने, मीना गांधले, रुकसाना शेख, मयूरी कराळे, दिपाली वाघ उपस्थीत होते.

सुत्रसंचालन नितीन पाटील यांनी केले व चित्रा शिंदे यांनी आभार मानले.



मतदार जनजागृती केल्याबद्दल स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान करताना जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला आदी.

# १०० शाळांत मतदार जनजागृती केल्याबद्दल डॉ.उद्धव शिंदे यांचा सन्मान

नगर - लोकसभा, विधानसभा निवडणुकीत अहिल्यानगर शहर व परिसरातील सुमारे १०० शाळांमध्ये मतदार जनजागृती केल्याबद्दल स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान करण्यात आला.

जिल्हा निवडणूक शाखेच्या वतीने १५ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जागृती करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या हस्ते डॉ. शिंदे यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मनपा आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणुक शाखा) राहुल पाटील आदी उपस्थित होते.

# यशोदानगर येथील मटका अड्ड्यावर छापा

नगर - बेकायदेशीररित्या लोकांकडून पैसे घेऊन कागदाचे चिठ्ठ्यावर आकडे लिहून कल्याण मटका चालवणाऱ्या यशोदा नगर येथील अड्ड्यावर तोफखाना पोलिसांनी छापा टाकून एकास ताब्यात घेतले. या कारवाईत ७३० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी अमित अश्विन कुमार (वय ४१, रा. नवलेनगर, गुलमोहर रोड, आम्रपाली गार्डन मागे, सावेडी) याच्या विरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात पो. कॉ. सतीश भवर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

